# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०१८

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**परतवाडा (जि.अमरावती) येथे मजूरांसाठी बांधण्यात आलेल्या भवनाचा वापर करु देण्याबाबत**

**(१) ९३०३ (०६-०४-२०१४). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परतवाडा (जि.अमरावती) येथे मेळघाटातील रोजगार संपल्यानंतर मजूरांसाठी बांधण्यात आलेल्या भवनाचा वापर करण्यासाठी त्यांना दिला जात नसल्याने या मजूरांना उघडयावर रात्र काढावी लागत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रोजंदारी करणाऱ्या मजूरांना सदरहू भवनाचा रात्री राहण्यासाठी वापर करु देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०६-११-२०१८) :** (१), (२) व (३) परतवाडा, ता. अचलपूर, जि. अमरावती येथील प्रश्नाधीन इमारत ही स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत “महिला औद्योगिक भवन” म्हणून बांधण्यात आली असून सदर इमारतीचा उपयोग मेळघाट येथील मजूरांच्या रात्रीच्या निवा-याकरीता करण्याचे नियोजित नव्हते. सध्या या भवनामध्ये मतदान यंत्र व नैसर्गिक आपत्तीचे साहित्य आहे. त्यामुळे या इमारतीत कोणत्याही खाजगी व्यक्तीला अथवा संस्थेला व मजूरांना रात्रीच्या निवा-याची सोय उपलब्ध करून देणे शक्य नाही. तसेच सदरहू इमारत ही वस्तीपासून दूर असल्याने राहण्यासाठी असुरक्षित आहे.

---

**ठाणे परिसरातील गावांमध्ये सी.टी.सर्व्हे होत नसल्याबाबत**

**(२) ४४५२१ (२९-०५-२०१६). श्री.संजय केळकर (ठाणे), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महानगरपालिका अस्तित्वात येऊन ३० वर्ष उलटूनही मौजे ओवळा मोघरपाडा भाईंदर व वडवलीच्या भागात सी.टी. सर्व्हे झालेला नसल्याने नागरिकांना प्रॉपर्टी कार्ड व सनद मिळत नसल्याने नागरिकांनी त्याबाबत माहे सप्टेंबर, २०१५ व त्यानंतर देखील वेळोवेळी प्रशासनाकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तथापि सदर परिसरात स्थानिकांना वास्तव्यासाठी घरे बांधताना आराखडा मंजूरीसाठी परवानगी दिली जात नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, असल्यास त्याचा निश्चित कालावधी किती,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (३१-०८-२०१८)** :(१) प्रस्तुत प्रकरणी प्रश्नात नमूद मौजे ओवळा, मोघरपाडा व भाईंदरपाडा या गावांची सन २००२ मध्ये मोजणी पूर्ण होवून चौकशीचे काम दिनांक १४.०१.२००५ रोजी पूर्ण झाले आहे.

त्यापैकी ओवळा या गावचे घटकदर दिनांक २५.०१.२०१६ रोजी मंजूर करण्यात आले असून सदर गाव दि. १५.०२.२०१७ पासून परिरक्षणासाठी घेण्यात आले आहे. त्यानुसार तेथील नागरिकांच्या मागणीनुसार नागरिकांना सनद व मिळकत पत्रिका पुरविण्यात येत आहेत.

मौजे मोघरपाडा या गावचे सविस्तर मोजणीचे काम मे.मोनार्च सर्व्हेज या खाजगी संस्थेने पूर्ण केलेले आहे. मात्र सदर कंपनीने १:५०० या परिमाणातील नकाशे जमा केलेले नाहीत. याबाबत कंपनीकडे पाठपुरावा सुरु आहे.

मौजे वडवली या गावाचे गावठाणाबाहेरील मिळकतींची सविस्तर मोजणीचे काम सन २००८ मध्ये पूर्ण झालेले आहे.

मौजे भाईंदर हे गाव मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या हद्दीत येत असून सदर गावाचे गावठाण क्षेत्राचे नगर भूमापन झालेले आहे व सदर गाव सन १९८४ मध्ये परिरक्षणासाठी घेण्यात आलेले आहे. त्यानुसार सदर गावासाठी स्वतंत्र परिरक्षण भूमापक यांची नियुक्ती करण्यात आली असून तेथील नागरिकांच्या मागणीनुसार नकाशे नक्कला व मिळकतपत्रिकांचे उतारे नागरिकांना पुरविण्यात येत आहेत.
(२), (३) व (४) मौजे ओवळे, मोघरपाडा, भाईंदरपाडा व वडवली या गावातील स्थानिकांना वास्तव्यासाठी घरे बांधताना आराखडा मंजूरीबाबत ठाणे महानगरपालिकेकडून गावठाण क्षेत्रात दाखल होणाऱ्या विकास प्रस्तावांना चौकशी रजिस्टरचा उतारा, जमिनीबाबतचा मालकी हक्क ग्राहय धरून ठाणे महानगरपालिकेकडून मंजूरी देण्यात येते.

---

## पुणे-मुंबई द्रुतगती महामार्गावर राज्य परिवहन महामंडळाच्या बसेसना टोलच्या दरात सवलत देण्याबाबत

**(३) ५३९०२ (२४-०८-२०१६). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे-मुंबई द्रुतगती महामार्गावर राज्य परिवहन महामंडळाच्या बसेसना शासन टोलच्या दरात सवलत देण्याच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य परिवहन महामंडळाची परिस्थिती बिकट असल्याने महामंडळास उभारी मिळण्यास बसेसना टोल दारात सवलत देणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती टोलच्या दरात सवलत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१४-११-२०१८) :**(१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) सुमित मल्लिक समितीने सादर केलेल्या अहवालातील शिफारशींमध्ये पुणे मुंबई द्रुतगती महामार्गावरील पथकर नाके बंद करणे अथवा हलक्या वाहनांना पथकर भरण्यापासून सुट देणे आर्थिक व कायदेशीरदृष्ट्या योग्य नसल्याची शिफारस केलेली होती. या शिफारशी शासनाने स्विकृत करुन, पुणे मुंबई द्रुतगती महामार्गावरील पथकर नाके बंद करता येणार नाही अथवा हलक्या वाहनांना सुट देता येणार नाही, असा निर्णय घेतला आहे. त्यामुळे एस. टी. महामंडळाच्या बसेसना सुध्दा पथकर दरात सवलत देता येणार नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे-मुंबई जुन्या महामार्गाची आयआरबी कंपनीकडून देखभाल व दुरुस्ती करण्याबाबत**

**(४) ६०७६३ (२४-०८-२०१६). श्री.महेश (दादा) लांडगे (भोसरी), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे-मुंबई जुन्या महामार्गावर आयआरबी या कंपनीकडून टोल वसुली करण्यात येत असून या रस्त्याची दुरुस्ती व देखरेख हि कामे आयआरबी कंपनीने करणे आवश्यक आहे,हे खरे आहे काय,

(२) तसेच या महामार्गावरील देहू रोड ते लोणावळा या दरम्यान बऱ्याच ओढयांवर संरक्षक कडे नसल्याने अपघाताचे प्रमाण वाढले असून अनेकांचे बळी गेले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास या महामार्गावर उंच दुभाजक नसणे,सूचना फलक नसणे,वाहतूक नियंत्रणाची व्यवस्था नसणे यामुळे मोठ्या प्रमाणात अपघात होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्य शासन प्रश्न भाग (१) मधील रस्त्याच्या देखभाल दुरुस्तीचे काम न करणाऱ्या व उक्त सुविधा न देणाऱ्या आयआरबी कंपनीविरुद्ध कारवाई करणार आहे काय,

(५) असल्यास, त्याचप्रमाणे या महामार्गाची तातडीने दुरुस्ती करण्यासंदर्भात शासन काय कार्यवाही करणार आहे ?

**श्री. एकनाथ शिंदे (१४-११-२०१८) :** (१) होय.
(२) या महामार्गावरील ओढ्यांवरील संरक्षण कठड्यांची दुरुस्ती करुन सुस्थितीत ठेवण्यात येत आहेत.
(३) या महामार्गावर रस्ते सुरक्षा विषयक आवश्यक सर्व बाबी कार्यान्वीत करण्यात आल्या असून वेळोवेळी त्यांची दुरुस्ती करण्यात येते. तसेच पोलीस विभागामार्फत वाहतुक नियंत्रीत ठेवण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) निविदेतील तरतुदीप्रमाणे संबंधीत कंपनीने रस्त्याची देखभाल व दुरुस्ती करुन रस्ता सुस्थितीत ठेवला आहे.
(५) महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांनी संबंधीत सवलतदारामार्फत रस्त्याची वेळोवेळी दुरुस्ती करुन रस्ता सुस्थितीत ठेवला आहे.

---

## मुंबईच्या सीमा प्रवेशावरील टोल नाक्यांमुळे ठाणे परिसरातील वाहतुकीच्या समस्येत वाढ झाल्याबाबत

**(५) ६६३९६ (१६-१२-२०१६). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अजित पवार (बारामती) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईच्या सीमा प्रवेशावरील टोल नाक्यांमुळे ठाणे परिसरातील वाहतुकीची समस्या अडचणीची बनलेली असताना मुंबई एन्ट्री पॉईंटवरील मुलुंड, ऐरोली आणि दहिसर हे टोलनाके बंद करण्यासंदर्भातील शासनाने नेमलेल्या समितीने माहे ऑगस्ट, २०१६ च्या दुस-या आठवड्यात शासनास अहवाल सादर केलेला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त सादर केलेल्या अहवालातील शिफारशींचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानुसार आतापर्यंत अहवालातील शिफारशीवर कार्यवाही करुन या परिसरातील वाहतुकीची समस्या कायमस्वरुपी सोडविण्याबाबत शासनाने आतापर्यंत कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१४-११-२०१८) :**(१) व (२) सुमित मल्लिक समितीने मुंबई पुणे द्रुतगती मार्ग व मुंबई एन्ट्री पॉईंट येथील पथकर नाके बंद करणे अथवा या पथकर नाक्यांवर हलक्या वाहनांना सुट देणे या अनुषंगाने आर्थिक व कायदेशीर बाबींचा अभ्यास करुन शासनास अहवाल सादर केला असून, यामध्ये पथकर नाके बंद करणे अथवा हलक्या वाहनांना सुट देणे ही बाब आर्थिकदृष्ट्या सुसाध्य व करारनाम्यातील तरतुदीनुसार योग्य होणार नसल्याचे शिफारशीमध्ये नमूद केले आहे.

या अनुषंगाने सुमित मल्लिक समितीने सादर केलेल्या अहवालातील शिफारशीस अनुसरुन शासनाने दि.०५.०९.२०१८ रोजी उपरोक्त पथकर नाके बंद करता येणार नाही. तसेच हलक्या वाहनांना सुट देता येणार नाही, असा निर्णय घेतला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कल्याण (जि. ठाणे) येथील दुर्गाडी ते भिवंडी बायपास रस्त्याबाबत**

**(६) ६७७९३ (१६-०१-२०१७). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण (जि. ठाणे) येथील दुर्गाडी ते भिवंडी बायपास रस्त्यावर पथदिवे नसल्याने तसेच खड्यामुळे गत पाच वर्षात ४९ जणांचा मृत्यू व ११८ जण जखमी झाले असून १६० अपघात झाल्याने दुर्गाडी-भिवंडी बायपास रस्ता मृत्यूचा सापळा बनत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याच्या दुरुस्तीबाबत कोणतीच कार्यवाही करण्यात येत नसल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रस्त्यावरील होणारे अपघात रोखण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१४-११-२०१८) :**(१) हे खरे नाही.

(२) महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने ठेकेदारांमार्फत या रस्त्याची आवश्यक ती दुरुस्ती करुन रस्ता वाहतुकीसाठी सुस्थितीत ठेवला आहे.

(३) या रस्त्यावरील वाढती वाहतूक लक्षात घेता अस्तित्वातील चार पदरी रस्त्याचे सहा पदरीकरण करण्याच्या कामाला दि.१३.०६.२०१७ रोजी झालेल्या मंत्रीमंडळ पायाभूत सुविधा समितीने दिलेल्या मंजुरीनुसार सदरहू प्रकल्पास प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. सद्य:स्थितीत काम प्रगतीत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोडोली (ता.पन्हाळा,जि.कोल्हापूर) येथील गाव ओढ्याचे अस्तित्व धोक्यात आल्याबाबत**

**(७) ७६४६४ (१९-०४-२०१७). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोडोली (ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर) येथील गाव ओढ्यावर ग्रामस्थांनी केलेल्या अतिक्रमणामुळे ओढ्याचे अस्तित्व धोक्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ओढ्यावर केलेल्या अतिक्रमणामुळे काठावर असलेल्या झाडांची तोड व दुषित पाण्यामुळे ओढ्याला नाल्याचे स्वरूप प्राप्त झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ओढ्यावरील अतिक्रमण रोखण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२२-११-२०१८) :** (१) व (२) कोडोली ता. पन्हाळा, जि.कोल्हापूर येथील ज्योतीर्लिंग गाव ओढयाबाबत दि.१८/०५/२०१७ रोजी प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली असुन सदर ओढा दक्षिण- उत्तर प्रवाहचा असून अंदाजे १० ते १२ कि.मी. लांबीचा आहे. ज्योतीर्लिंग गाव ओढयावर लगतच्या शेतकऱ्यांनी शेती प्रयोजनार्थ काही प्रमाणात अतिक्रमण केल्याचे दिसून आलेले आहे. अतिक्रमणामुळे तसेच ओढयाच्या पात्रालगत दोन्ही बाजुस लहान व मोठी झाडे- झुडूपे असल्याने ओढा पात्र अरूंद होऊन प्रवाहास अडथळा निर्माण होत असल्याचे दिसुन आले आहे. गावातील सांडपाणी ओढापात्रामध्ये मिसळत असल्याने ओढयाला नाल्याचे स्वरूप प्राप्त झाले आहे.

(३) ओढयावरील अतिक्रमण काढण्याच्या कार्यवाहीच्या अनुषंगाने ओढयाची मोजणी करण्यासाठी उप अधिक्षक, भूमि अभिलेख, पन्हाळा यांनी दि.०२/०२/२०१८ व दि.०३/०२/२०१८ ही तारिख नेमली होती. तथापि, ओढयातील झाडी, वाढलेली झुडुपे, उंच गवत व बांबूची बेटे आणि पात्रातील साठलेली घाण व सांडपाण्यामुळे या क्षेत्राची मोजणी करता आली नाही. सदरची मोजणी करण्यासाठी ओढयातील झाडी, वाढलेली झुडुपे, उंच गवत व बांबूची बेटे आणि पात्रातील साठलेली घाण काढण्यासाठी येणाऱ्या खर्चाबाबत उप अभियंता, लघुसिंचन विभाग यांचेकडून अंदाजपत्रक प्राप्त करून घेण्यात येत असून त्यानुसार निधीची तरतूद केल्यानंतर ओढापात्र स्वच्छ करून मोजणी करण्याचे व त्यानुसार अतिक्रमण काढण्याचे संकल्पित आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबई- पुणे महामार्गावरील काळुंद्रे नदीवरील असणा-या पूलाच्या दुरुस्तीबाबत**

**(८) ७७०१५ (१२-०४-२०१७). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई- पुणे महामार्गावरील काळुंद्रे नदीवर असणा-या पूलाच्या दुरुस्तीबाबत तसेच कोन आजीवली येथील अर्धवट अवस्थेत बांधलेल्या उड्डानपूलाचे काम पूर्ण होणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा. सार्वजनिक बांधकाम मंत्री यांना अनुक्रमे दिनांक १६ मार्च ,२०१६ व दिनांक १२ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास निवेदन देऊनही अद्यापपर्यंत कोणतीच कार्यवाही करण्यात आलेली नाही आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने काळुंद्रं नदीवर असणा-या पूलाच्या दुरुस्तीबाबत तसेच कोन आजीवली येथील अर्धवट अवस्थेत बांधलेल्या उड्डानपूलाचे काम पूर्ण होणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१४-११-२०१८)** :(१) हे खरे नाही.

राष्ट्रीय महामार्ग ४ वरील कोन येथे नवीन उड्डाणपुलाचे काम व काळुंद्रे नदीवरील नवीन पुलाचे काम, व गाढी नदी वर नवीन पुलाचे काम, पळस्पे ते कळंबोली दरम्यान चौपदरीकरणाच्या कामात समाविष्ट असून सदरील काम ईपिसी तत्वावर पूर्ण करण्यासाठी कंत्राट दाराची नियुक्ती दिनांक ०१.१२.२०१६ (कोन पूल) व दिनांक ०१.०२.२०१७ (पळस्पे ते कळंबोली) रोजी करण्यात आली असून कामे हाती घेण्यात आली आहेत. सदरील चौपदरीकरणाच्या कामात काळुंद्रे नदी वरील अस्तीतवातील पुलाची संरचनात्मक दुरुस्तीचे काम अंतर्भूत असून दुरुस्तीचे काम पूर्ण करण्यात आले आहेत.

तसेच मुंबई - पुणे राष्ट्रीय महामार्ग ४ चे रुंदीकरण करून सहा / आठ पदरी करून पनवेल शहरा बाहेरून गाढी नदी व काळुंद्र नदीवर नवीन पूल बांधने बाबत जनहित प्रवासी संघ पनवेल यांचे पत्र मा. पालक मंत्री, रायगड जिल्हा व मा. मंत्री सा. बा. विभाग यांच्या कार्यालयातून महामंडळाला दिनांक १७.०९.२०१६ रोजी प्राप्त झाले होते व सदर पत्रा विषयी या कार्यालयाकडून दिनांक ०३.०१.२०१६ रोजी जनहित प्रवासी संघ व मा. पालक मंत्री, रायगड जिल्हा यांना कळवण्यात आले होते.

(२) काळुंद्रे नदी वरील पुलाची पाहणी मे. लायन इंजिनीअरिंग कंन्सल्टट या सल्लागाराने सविस्तर पाहणी करून त्यांनी सुचवलेल्या दुरुस्त्या पूर्ण करण्यात आल्या आहेत. सबब या प्रकरणी चौकशीचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई-पुणे महामार्गावर (एक्सप्रेस वे) “इंटेलिजंट ट्रॅफिक मॉनिटरिंग सिस्टिम” राबविण्याबाबत

**(९) ८२१५४ (१३-०४-२०१७). श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-पुणे महामार्गावर (एक्सप्रेस वे) “इंटेलिजंट ट्रॅफिक मॉनिटरिंग सिस्टिम” राबविण्याबाबत प्रधान सचिवांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीतील निर्णय इतिवृत्तातून वगळण्यात आल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई-पुणे महामार्गावर “इंटेलिजंट ट्रॅफिक मॉनिटरिंग सिस्टिम” राबविल्यास एक्सप्रेस वे वरील वाहतूक सुरळीत आणि सुरक्षित होण्यास मदत झाली असती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पुणे- मुंबई महामार्गावर “इंटेलिजंट ट्रॅफिक मॉनिटरिंग सिस्टिम” राबविण्याबाबत शासन विचारधीन असल्यास याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१४-११-२०१८)** :(१) हे खरे नाही.

(२) होय.

(३) मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर इंटेलिजन्टस हायवे मॅनेजमेंट सिस्टीम कार्यान्वीत करण्याकरीता प्रधान सचिव (विशेष) गृह विभाग यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या बैठकीतील निर्णयानुसार निविदा विषयक कार्यवाहीसाठी उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांचे अध्यक्षतेखाली अतिरिक्त पोलीस महासंचालक (वाहतुक), आयुक्त (परिवहन) व संचालक (माहिती तंत्रज्ञान) विभागाचे सदस्य असलेली समिती गठीत करण्यात आली आहे.

त्यानंतर दि.०५.०३.२०१८ रोजी उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांचे अध्यक्षतेखाली अप्पर पोलीस महासंचालक (वाहतुक), सह व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (अभियांत्रिकी) व मुख्य अभियंता (विशेष प्रकल्प) यांचा समावेश असलेली समिती पुढील आवश्यक कार्यवाही करण्यासाठी स्थापन करण्यात आली. सदर समितीच्या दि.२३.०४.२०१८ रोजी संपन्न झालेल्या बैठकीतील निर्णयानुसार महाराष्ट्र शासनाच्या माहिती संचालनालय विभागाच्या अधिकृत सल्लागाराकडून दि.१८.०५.२०१८ रोजी इंटिलिजन्ट हायवे मॅनेजमेंट सिस्टीमबाबत सादरीकरण करुन घेण्यात आले. त्यानुसार मे. के.पी.एम.जी. या कंपनीस सदर कामसाठी सल्लागार म्हणून दि.२८.०६.२०१८ रोजी नियुक्त करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**दस्तनोंदणीच्या महसूलात २१% घट झाल्याबाबत.**

**(१०) ९०७५३ (१२-०८-२०१७). श्री.राजेश टोपे (घनसावंगी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देशात नोटबंदीच्या निर्णयानंतर रोख व्यवहारावर मर्यादा आल्याने रजिस्ट्री व्यवहारावर त्याचा परिणाम होऊन मालमत्ता खरेदी विक्रीच्या नोंदणीत घट झाल्याने दस्तनोंदणीच्या महसूलात २१% घट झाली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करून दस्त नोंदणीत झालेली घट भरून काढण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१६-११-२०१८) :** (१) आर्थिक वर्ष सन २०१५-१६ च्या तुलनेत सन २०१६-१७ या वर्षी जमा महसूल व दस्तसंख्या खालीलप्रमाणे-

| अ.क्र. | वर्ष | दस्तसंख्या | जमा मुद्रांक शुल्क महसूल (रु.कोटीत) |
|---|---|---|---|
| १. | २०१५-१६ | २३०८८०९ | २१७६७.०१ |
| २. | २०१६-१७ | २१२२५९१ | २१००६.५७ |

सन २०१५-१६ च्या तुलनेत सन २०१६-१७ मध्ये मुद्रांक शुल्क महसूलात फक्त ३.५% घट झालेली दिसून येत आहे.

तथापि, मागील आर्थिक वर्ष सन २०१६-१७ च्या तुलनेत सन २०१७-१८ या वर्षीची दस्तसंख्या व जमा महसूल खालीलप्रमाणे-

| अ.क्र. | वर्ष | दस्तसंख्या | जमा मुद्रांक शुल्क महसूल |
|---|---|---|---|
| १. | २०१६-१७ | २१२२५९१ | २१००६.५७ |
| २. | २०१७-१८ | २१९३१४९ | २६४५१.०२ |

वरीलप्रमाणे सन २०१६-१७ च्या तुलनेत सन २०१७-१८ मध्ये दस्त संख्येत ३.३२% वाढ झाली असून महसूलातही २५.९२% वाढ झालेली आहे. म्हणजेच सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात दस्त संख्येत व जमा महसूलात घट झालेली नसुन वाढच झाली आहे.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईत अतिवृष्टीमुळे सखल भागांतील घरांत पाणी शिरुन वित्तहानी झाल्याबाबत**

**(११) ९५१४७ (०१-०१-२०१८). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत दिनांक २९ ऑगस्ट, २०१७ रोजी अतिवृष्टी झाली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अतिवृष्टीमुळे मुंबईतील सखल भागांतील घरांत पाणी शिरुन मोठी वित्तहानी झाली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी नुकसानग्रस्तांना शासनाने कोणत्या स्वरुपाची मदत केली वा करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१५-११-२०१८) :**(१) (२) व (३) मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्यात दिनांक २९ ऑगस्ट, २०१७ रोजीच्या अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे क्षेत्रीय अधिकाऱ्यांमार्फत करण्यात आलेले आहेत.

त्यानुसार शासन निर्णय, दिनांक १३.०५.२०१५ मधील तरतूदींनुसार मुंबई उपनगरातील बाधित झालेल्या ४६ पात्र कुटुंबियांना प्रत्येकी रु. ३८००/- प्रमाणे मदतीचे वाटप करण्यात आले आहे.सदर पावसामुळे बाधित झालेल्या मुंबई शहर जिल्ह्यातील १५६९ कुटुंबांचे पंचनामे करण्यात आले. तथापि, शासन निर्णय दिनांक १३.०५.२०१५ मधील तरतूदींनुसार मदत अनुज्ञेय नसल्याने सदर बाधित कुटुंबांना मदत वाटप करण्यात आलेली नाही.

मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्यांत सदर अतिवृष्टीमुळे मृत झालेल्या ८ पैकी ७ मृत व्यक्तींच्या वारसांना शासन निर्णय, दिनांक १३.०५.२०१५ मधील तरतूदींनुसार प्रत्येकी रु. ४ लक्ष प्रमाणे मदत वाटप करण्यात आली असून, उर्वरित एका मृत व्यक्तीच्या वारसांनी मदत घेण्यास नकार दिल्याने सदर रक्कम शासनजमा करण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**बुलढाणा जिल्हयातील रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत**

**(१२) १०२०४२ (२१-१२-२०१७). श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलढाणा जिल्हयातील सार्वजनीक बांधकाम विभागाअंतर्गत येणारे रस्ते अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाले असून अनेक रस्त्यावर अपघात घडून नागरिकांचे मृत्यू होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, चिखली तालुक्यातील रोहडा-गांगलगांव-कवठळ या रस्त्यावर मोटर सायकल अपघातामध्ये मृत्यू झाल्याची घटना घडली असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीनुसार बुलढाणा जिल्हयातील रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०५-११-२०१८)** :(१) हे खरे नाही.
(२) व (३) सदर रस्ता हा इतर जिल्हा मार्ग दर्जाचा असून अंढेरा ग्रामीण पोलीस स्टेशनच्या अहवालानुसार सन २०१७ मध्ये रोहडा गांगलगांव रस्त्यावर रोहडा गावाजवळ झालेला अपघात हा मालवाहक ऑटो चालकाच्या चुकीने झाला आहे.
(४) रोहडा ते गांगलगांव या इतर जिल्हा मार्ग क्र.१११ च्या भाग रस्त्याचे काम मुख्यमंत्री ग्रामसडक योजना सन २०१७-१८ अंतर्गत मंजुर आहे व गांगलगांव ते कवठळ या इतर जिल्हा मार्ग क्र.१२० या रस्त्यावर प्रधानमंत्री ग्राम सडक योजने अंतर्गत काम करण्यात आले आहे.
तसेच बुलढाणा जिल्हयातील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अंतर्गत असलेल्या रस्त्यांची दुरुस्ती सन २०१७-१८ मध्ये व्दिवार्षीक रस्ते दुरुस्ती कार्यक्रमांतर्गत करण्यात येऊन, रस्ते सुस्थितीत ठेवण्यात आले आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पुर्व विदर्भातील धान पिकाचे विविध रोगाच्या प्रादुर्भावामुळे झालेले नुकसान

**(१३) १०४८२५ (०१-०४-२०१८). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुर्व विदर्भातील नागपूर, चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा व गोंदिया या जिल्हयामध्ये हजारो शेतक-यांच्या धान पिकावर मावा, तुडतुडे, करपा,गेरव्या,काजळी,मानमोळी या किडी रोगाने आक्रमण करुन धान उत्पादक शेतक-यांचे मोठे नुकसान केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील प्रकरणी स्थानिक प्रशासनाने उपरोक्त सर्व गावातील नुकसान झालेल्या शेतक-यांचे सर्वे करण्याचे आदेश दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरील प्रकरणी सर्वे करण्यात आला काय व त्याचा तपशिल काय आहे,

(४) असल्यास, सर्वेच्या अनुषंगाने कोणताही शेतकरी वंचित राहू नये याची दक्षता घेऊन शेतक-यांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१५-११-२०१८) :**(१), (२), (३) व (४) पूर्व विदर्भातीलनागपूर, चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया या जिल्हयांमध्ये बोंडअळीच्या प्रादुर्भावामुळे कापूस पिकांचे व तुडतुडे रोगाच्या प्रादुर्भावामुळे धान पिकांचे नुकसान झाल्याचे निदर्शनास आले. त्यानुसार महसूल विभाग, कृषी विभाग व ग्रामविकास विभागाने केलेल्या संयुक्त पंचनाम्यानुसार नागपूर विभागात कापूस पिकांखालील ४,४०,०९७.८१ हेक्टर क्षेत्राचे व धान पिकांखालील २,४८,५२२.३४ हेक्टर क्षेत्राचे ३३ टक्क्यांपेक्षा जास्त नुकसान झाल्याचे दिसून आले. त्यानुसार सदर आपत्तीमुळे बाधित झालेल्या आपदग्रस्तांसाठी शासन निर्णय दिनांक९.०५.२०१८, दिनांक २५.५.२०१८ व दिनांक १२.०७.२०१८ अन्वये नागपूर जिल्हयासाठी रु. ४६८४ लक्ष ,चंद्रपूर जिल्हयासाठी रु. ११८०२ लक्ष, , गडचिरोली जिल्हयासाठी रु.२३०२ लक्ष, भंडारा जिल्हयासाठी रु. ६७९२.१४ लक्ष व गोंदिया जिल्हयासाठी रु. ४१५०.६८ लक्ष एवढा मदतनिधी मंजूर करण्यात आला असून सदर निधीवाटपाची कार्यवाही तहसिलस्तरावर सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शासनाच्या रेडीरेकनर दरामध्ये सुधारणा करण्याबाबत

**(१४) १०५०९४ (२७-०३-२०१८). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर),**

**श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमर काळे (आर्वी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.अमल महाडीक (कोल्हापूर दक्षिण), श्री.अनिल बाबर (खानापूर), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने रेडीरेकनरच्या दरामध्ये सुधारणा करण्यासाठी समिती नेमली असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार रेडीरेकनरच्या दरामध्ये कोण कोणत्या सुधारणा शासनाला अपेक्षित आहे किंवा शासनाच्या विचाराधीन आहे,

(३) असल्यास, या समितीमार्फत किती कालावधीत अहवाल सादर करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०३-११-२०१८) :** (१) शासनाने रेडीरेकनरच्या दरामध्ये सुधारणा करण्यासाठी समिती नेमली नसल्याने, हे खरे नाही.

(२), (३) व (४) उक्त प्रश्न उद्‌भवत नाहीत.

---

### प्रिमियर या बंद पडलेल्या कंपनीच्या ८६ एकर जमिनीची बेकायदा विक्री केल्याबाबत

**(१५) १०५२७४ (०४-०४-२०१८). श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.अमर काळे (आर्वी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्रिमियर या बंद पडलेल्या कंपनीच्या ८६ एकर जमिनीवर १८६ कोटी रुपयांचा कर्जाचा बोजा असताना तत्कालीन महसूल मंत्री यांनी सन २००९ मध्ये सर्वसाधारण कर्जमाफी योजनेअंतर्गत ही जमीन अनंत डेव्हलपर्स यांना देण्याचा निर्णय घेऊन या खाजगी व्यवहारासाठी शासकीय परिपत्रक काढल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे आहे काय,

(२) असल्यास, उक्त परिपत्रकाची मुदत सन २०१० ला संपल्यानंतर त्याबाबत पुन्हा परिपत्रक काढून सन २०१५ मध्ये विशेष वसाहत प्रकल्पासाठी तीन वर्षाची मुदतवाढ देऊन अनंत डेव्हलपर्सचा कोटयवधी रुपयांचा फायदा होण्याकरीता केलेल्या बेकायदेशीर कृत्याची चौकशी करण्याची मागणी महात्मा गांधी मानव अधिकार फोरमचे संस्थापक श्री. प्रदीप भालेकर यांनी लोकायुक्त, मुख्यमंत्री तसेच अन्य संबंधीत अधिकाऱ्यांकडे दिनांक २३ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास केली आहे , हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अनंत डेव्हलपर्सने ती जमीन शेतकऱ्यांना विश्वासात न घेता परस्पर निर्मल लाईफ स्टाईल ग्रुप यांना ११५ कोटी रुपयांना विकली त्यानंतर निर्मल लाईफ स्टाईलने आर्थिक संकटात सापडल्याचे कारण देऊन शेतकऱ्यांना विश्वासात न घेता ती जमीन लोढा ग्रुपला १८५ कोटींना विकून शासनाच्या विविध कायद्यांचा भंग केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, व प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहे व त्यानुसार या प्रकरणातील दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (३-११-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही,
(३) अशी बाब निदर्शनास आली नाही.
(४), (५), व (६) प्रश्न उद्‌भवत नाही

---

**वसई पूर्वेतील कामण येथील फेरफार नोंदीसाठी तलाठी श्री. गणेश पाटील यांनी ४० हजारांची लाच मागितल्याबाबत**

**(१६) १०६७९९ (२७-०३-२०१८). श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वसई पूर्वेतील कामण (ता.वसई, जि.पालघर) येथील जागेवरील फेरफार नोंदीसाठी तलाठी श्री. गणेश पाटील यांनी ४० हजारांची लाच मागितल्याप्रकरणी त्यांच्यासह सहायक कुंदन बरक याला लाचेच्या रकमेतील २४ हजारांचा पहिला हफ्ता स्विकारताना ठाणे लाचलूचपत प्रतिबंधक विभागाने पकडल्याचे दिनांक ०९ जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीनुसार उक्त तलाठी व इतर दोषींविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०८-११-२०१८) :**(१), (२) व (३) हे खरे आहे.

तक्रारदार श्री. पंकज आत्माराम दळवी यांच्याकडून मौजे मोरी, ता. वसई येथील सर्व्हे नं. ८/३, ९/३, १८/१, २०/३ ही जमीन त्यांचे मालक श्री. राकेश पाटील व अन्य ४ जणांच्या नावाने फेरफार करण्यासाठी, श्री. गणेश मधुकर पाटील, तलाठी सजा कामण, ता. वसई यांनी प्रथमत: रु.४०,०००/- इतक्या लाचेची मागणी केली व त्यापैकी रु.६,०००/- पूर्वीच स्वीकारुन उर्वरित लाचेची मागणी करुन रु.२४,०००/- इतकी रक्कम श्री. कुंदन बरफ या खाजगी इसमामार्फत स्वीकारताना ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे यांच्याकडून सापळा कारवाई करण्यात आली. त्यामुळे लाचलुपत प्रतिबंधक अधिनियम, १९८८ च्या कलम ७, १२, १३ (१)(ड) सह १३ (२) अनुसार श्री. गणेश मधुकर पाटील, तलाठी सजा कामण, ता. वसई व श्री. कुंदन बरफ, खाजगी इसम यांच्याविरुध्द वालीव पोलीस स्टेशन, पालघर ग्रामीण येथे दाखल करण्यात आल्याचे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे यांनी दिनांक ०९.०१.२०१८ रोजी कळविले होते.

त्यानुसार उपविभागीय अधिकारी, वसई यांच्या दिनांक २३.०१.२०१८ च्या आदेशान्वये श्री. गणेश मधुकर पाटील, तलाठी सजा कामण, ता. वसई, जि. पालघर यांना दिनांक ०८.०१.२०१८ पासून शासन सेवेतून निलंबित करण्यात आलेले आहे.
संबंधित कर्मचाऱ्याविरुध्द विभागीय चौकशीची कार्यवाही उप विभागीय अधिकारी, वसई यांच्यास्तरावर प्रस्तावित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हिमायतनगर (जि.नांदेड) येथील तहसिलदारांच्या दिरंगाईमुळे सोयीबीन उत्पादक शेतकरी अनुदानापासून वंचित असल्याबाबत**

**(१७) १०९१७९ (०१-०४-२०१८). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने प्रधानमंत्री पीकविमा योजनेत सहभाग घेतला नाही अशा शेतक-यांना ५० टक्के सोयीबीन नुकसानीचे अनुदान जाहीर केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, हिमायतनगर (जि.नांदेड) येथील तहसिलदारांच्या दिरंगाईमुळे गत वर्षापासून येथील सोयीबीन उत्पादक शेतकरी या अनुदानापासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास,या संदर्भात शासनाने चौकशी करुन येथील सोयाबीन उत्पादक शेतक-यांचे थकीत अनुदान देण्यासोबतच, संबंधित शेतक-यांना अनुदानापासून वंचित ठेवणा-या संबंधित अधिका-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१५-११-२०१८) :** (१) (२) व (३) माहे जून ते ऑक्टोबर २०१६ मधील अतिवृष्टीमुळे बाधित शेतकऱ्यांना पिक नुकसानीवर मदत जाहीर करण्याचा निर्णय, शासन निर्णय दिनांक ०९.०१.२०१७ अन्वये घेण्यात आला असून, सदर शासन निर्णयान्वये ज्या शेतकऱ्यांनी प्रधानमंत्री पिक विमा योजनेअंतर्गत पिक विमा काढलेला आहे, अशा शेतकऱ्यांना प्रधानमंत्री पिक विमा योजनेअंतर्गत मंडळनिहाय भरपाईची जी रक्कम देय असेल त्या रक्कमेच्या ५०% रक्कम प्रधानमंत्री पिक विमा योजनेत सहभागी नसलेल्या शेतकऱ्यांना शासनाकडून मदत म्हणून देण्यात येईल असा निर्णय घेतला आहे.

त्यानुसार शासन निर्णस दिनांक २०.०७.२०१८ अन्वये नांदेड जिल्हयात माहे एप्रिल ते नोव्हेंबर २०१६ या कालावधीत झालेल्या अतिवृष्टी व अवेळी पावसामुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना मदतीसाठी रु. २६१.९६ कोटी एवढा निधी वितरित करण्यात आला असून, त्यापैकी हिमायतनगर तालुक्यास रु. ८,५७,९८,९८८ एवढा निधी मंजूर करण्यात आला आहे. सदर निधीवाटपाची कार्यवाही संबंधित तहसिलदारांच्या स्तरावर सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापूर शहरासाठी दोन वर्षापुर्वी २० हजार कोटींच्या विविध कामांचा शुभारंभ करण्यात आल्याबाबत**

**(१८) ११०५०९ (१९-०४-२०१८). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर शहरासाठी दोन वर्षापुर्वी २० हजार कोटींच्या विविध कामांचा शुभारंभ मा. केंद्रीय वाहतूकमंत्री भारत सरकार यांनी केला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यातील अद्याप एकही कामाला सुरुवात करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त २० हजार कोटींच्या कामाला गती देण्यासाठी शासनाने पाठपुरावा केला आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१४-११-२०१८) :**(१) हे अंशत: खरे आहे.

दोन वर्षापूर्वी मा. केंद्रिय वाहतूकमंत्री ,भारत सरकार यांनी सुमारे वीस हजार कोटींची घोषित केलेली विविध कामे ही फक्त सोलापूर शहरासाठी नाहीत. तथापि ही कामे संपूर्ण सोलापूर जिल्ह्याकरिता घोषित केली होती.

(२) हे खरे नाही.

सद्यस्थितीत घोषित केलेल्या कामांपैकी, सोलापूर शहराकरिता केंद्र शासनाच्या रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयांतर्गत भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण,सोलापूर यांचेमार्फत जुना पुना नाका ते सातरस्ता चौक कि.मी.०/०० ते ५/४५० या लांबीत उड्डाणपूलाचे बांधकाम करणे (रु.४९५.९५ कोटी) व सोलापूर शहरामध्ये बोरामणी नाका रा.म.९ -कुमठा चौक ते रा.म.१३ चौक कि.मी.०/०० ते कि.मी.४/९२० या लांबीत उड्डाणपूलाचे बांधकाम करणे (रु.३३४.५३ कोटी) या दोन कामांकरिता ( एकूण रु.८३०.४८ कोटी) भूसंपादन व निविदा प्रक्रिया हाती घेण्यात आली आहे.

तसेच राज्यशासनामार्फत सोलापूर जिल्हयाकरिता उपयुक्त ठरणारी अशी रु.१०१४.७८ कोटी किंमतीची खालील चार कामे हाती घेण्यात आली असून सदर कामे सदयस्थितीत प्रगतीपथावर आहेत.

१) गुलबर्गा अफजलपूर दुधनी अक्कलकोट सोलापूर रा.म.क्र.१५० कि.मी.७०/६८२ ते १०६/५२६ कॉक्रिटीकरण (रु. २११.४२ कोटी)

२) टेंभुर्णी करकब पंढरपूर रा.म.क्र.५६१ए कि.मी.०/०० ते ३६/१९० कॉक्रिटीकरण (रु.११२.४९ कोटी)

३) पंढरपूर मंगळवेढा उमदि.रा.म.क्र.५६१ए कि.मी.४०/८०० ते ९५/१३६ कॉक्रिटीकरण (रु.४२२.०२ कोटी)

४) अक्कलकोट नळदुर्ग रा.म.क्र.६५२ कि.मी.३०/८८४ ते ७०/७०९ कॉक्रिटीकरण (रु.२६८.८५ कोटी)

(३) राष्ट्रीय महामार्गाच्या सदर घोषित प्रकल्पांबाबत मा.मुख्यमंत्री व मा. केंद्रीय मंत्री, रस्ते परिवहन भूपृष्ठ, महामार्ग आणि जहाजबांधणी यांनी दि. ८ सप्टेंबर २०१७, दि. २० जानेवारी २०१८ व दि.२३ मार्च २०१८ रोजी मुंबई येथे बैठक आयोजित केली होती.

तसेच सदर राष्ट्रीय महामार्गाच्या प्रकल्पांबाबत १२ मे २०१८ रोजी विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे यांनी संयुक्त आढावा बैठक घेवून जिल्हाधिकारी व भूसंपादन अधिकारी यांना विहीत वेळेत भूसंपादनाची कार्यवाही पूर्ण करुन जमीन ताब्यात देण्याचे निर्देश दिले असल्याचे प्रकल्प संचालक,भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांनी कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भिवंडी (जि.ठाणे) तालुक्यात पडलेल्या मुसळधार पावसामुळे नुकसान झालेल्या शेतक-यांना नुकसान भरपाई देण्याबाबत**

**(१९) ११०५९१ (०१-०४-२०१८). श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (जि.ठाणे) तालुक्यात दि.२९ ऑगस्ट, २०१७ रोजीच्या सुमारास पडलेल्या मुसळधार पावसामुळे शेत पिकांचे नुकसान झालेल्या शेतक-यांना नुकसान भरपाई देण्यासंदर्भात तहसिलदारांकडे तेथील ग्रामस्थांनी दि.४ ऑक्टोबर, २०१७ रोजी च्या सुमारास लेखी निवेदन दिले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनानुसार नुकसानग्रस्त शेतक-यांना नुकसानभरपाई देण्यासंदर्भात शासनाने निर्णय घेतला आहे काय, त्यांचे स्वरुप काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२०-११-२०१८)** :(१) होय.

(२) शासन निर्णय दिनांक १०.०७.२०१८ अन्वये, ठाणे जिल्ह्यात माहे एप्रिल ते ऑक्टोबर २०१७ या कालावधीत झालेल्या अतिवृष्टी व अवेळी पावसामुळे झालेल्या शेतिपिकांच्या नुकसानीसाठी बाधित झालेल्या शेतकऱ्यांना मदत देण्यासाठी रु. २४५५.७१ लक्ष एवढा निधी वितरित करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रावेर (जि.जळगाव) मतदार संघातील आदिवासी भागातील मुख्य रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत**

**(२०) १११५८२ (०४-०४-२०१८). श्री.हरीभाऊ जावळे (रावेर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रावेर (जि.जळगाव) मतदार संघातील आदिवासी भागातील मुख्य रस्ते वाहतुकीस अत्यंत गैरसोईचे झाल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्यांची शासनाने पाहणी केली आहे काय, त्यात काय निदर्शनास आले,

(३) असल्यास, त्यानुसार शासनाने सदर रस्त्यांची दुरुस्ती करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१६-११-२०१८) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

सदर रस्त्यावर क्षमतेपेक्षा जास्त अवजड वाहनांची मोठ्या प्रमाणावर वाहतुक होत असल्याने खड्डे पडत असल्याचे क्षेत्रीय अधिका-यांच्या पाहणीत आढळून आले आहे.

(३) सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारितील रस्त्यांवर वार्षिक देखभाल दुरूस्ती कार्यक्रमांतर्गत खड्डे भरण्यात येऊन रस्ता वाहतुकीस सुस्थितीत करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**हिंगोली शहरातील निजामकालीन शासकीय विश्रामगृहाची दुरुस्ती करण्याबाबत**

**(२१) ११२५५३ (२७-०३-२०१८). श्री.तानाजी मुटकुळे (हिंगोली) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली शहरातील नवीन शासकीय विश्रामगृहालगतच्या निजामकालीन जुन्या विश्रामगृहामध्ये घानीचे साम्राज्य पसरले असून येथे अनधिकृत लोकांचा वावर तसेच चोऱ्याही झाल्या असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निजामकालीन विश्रामगृहाच्या देखभाल दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध नाही आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करून सदर विश्रामगृहाच्या दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२०-११-२०१८) :** (१) हे खरे नाही

(२) हे खरे नाही.

(३) शासकीय अनिवासी इमारतीची विशेष दुरुस्ती अंतर्गत विश्रामगृह इमारतीच्या दुरुस्तीसाठी रु.५.०० लक्ष रकमेचा जॉब मंजूर केलेला आहे. तांत्रिक मंजूरीची कार्यवाही पुर्ण झाल्यावर दुरुस्तीचे काम हाती घेण्यांत येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**गोवळ (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) येथील शेतकऱ्यांच्या जमिनी परत करण्याबाबत**

**(२२) ११३६४४ (२७-०३-२०१८). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोवळ (ता.राजापूर,जि.रत्नागिरी) येथील गोवळ खालची व वरचीवाडी वझराचे काटे येथील ५४ भूमिहीन शेतक-यांना खोतांच्या ताब्यात असलेल्या जमिनी दिनांक ३ एप्रिल, १९७६ रोजी तहसिलदारांमार्फत देण्यात आल्या असून गत चाळीस वर्षे जमिनी कसत असलेल्या या शेतक-यापैकी २५ शेतकऱ्यांच्या जमिनींचा ७/१२ कोणतीही नोटीस न देता शासनाने रदद केल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या शेतकऱ्यांचा सातबारा रदद केल्यामुळे ते भूमिहीन झाले असून त्यांच्या रोजंदारीचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार उक्त शेतकऱ्यांच्या जमिनी परत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१६-११-२०१८) :** (१) व (२), श्री. पांडूरंग जनार्दन ठाकुर देसाई, रा. गोवळ, ता. राजापूर, जि. रत्नागिरी यांनी महाराष्ट्र शेतजमीन (ज.धा.क.म.), अधिनियम, १९६१ अन्वये दाखल केलेल्या विवरणपत्रानुसार, त्यांनी धारण केलेल्या सर्व्हे नं. ५४/१८, ५८/३, ६५/१ ते ८, ७९/१ व ८३/२ या जमीन दिनांक २८/०३/१९७६ रोजीच्या आदेशान्वये अतिरिक्त भू-निर्धारण न्यायाधिकरण, राजापूर यांनी अतिरिक्त ठरविल्या होत्या. अतिरिक्त भू-निर्धारण न्यायाधिकरणाचे दिनांक २८/०३/१९७६ रोजीचे आदेश अतिरिक्त आयुक्त, मुंबई विभाग यांनी पुनर्विलोकनामध्ये घेवून दिनांक १९/०४/१९७७ रोजीच्या आदेशान्वये सदरचे प्रकरण पुन्हा अतिरिक्त भू-निर्धारण न्यायाधिकरणाकडे पाठविले. त्यानंतर दिनांक १०/०४/१९७८ रोजीच्या आदेशान्वये अतिरिक्त भू-निर्धारण, राजापूर यांनी पूर्वी अतिरिक्त ठरविलेल्या सर्व्हे नं. ७९/१ व ६५/१ ते ८ हे अतिरिक्त ठरवून उर्वरित सर्व्हे नं. मधील जमीनी मुळ मालकास परत करण्यात आल्या आहेत. अतिरिक्त भू-निर्धारण न्यायाधिकरण, राजापूर यांच्या दिनांक २८/०३/१९७६ च्या आदेशान्वये अतिरिक्त ठरविण्यात आलेल्या जमिनींचे वाटप फेरफार क्र.२४४८, दिनांक ३०/०४/१९७६ अन्वये करण्यात आले होते. परंतु, सदर प्रकरणातील अतिरिक्त भू-निर्धारण न्यायाधिकरण, राजापूर यांचे दिनांक १०/०४/१९७८ रोजीच्या आदेशान्वये पूर्वी अतिरिक्त ठरविलेल्या जमिनीपैकी स.न. ७९/१ व ६५/१ ते ८ या व्यतिरिक्त उर्वरित क्षेत्र अतिरिक्त क्षेत्रातून वगळले असून फेरफार क्र. २४८२ अन्वये मुळ मालकास परत करण्यात आल्या आहेत.

(३), (४) व (५) जमीनीचे मुळ मालक श्री. पांडूरंग जनार्दन ठाकुर देसाई यांनी धारण केलेल्या व अतिरिक्त भू-निर्धारण न्यायाधिकरणाच्या दिनांक २८/०३/१९७६ रोजीच्या आदेशान्वये अतिरिक्त ठरविण्यात आलेल्या जमीनीचे वाटप काही भूमिहिनांना फेरफार क्र. २४४८, दिनांक

३०/०४/१९७६ रोजी करण्यात आले होते. तथापि, अतिरिक्त भू-निर्धारण न्यायाधिकरणाच्या दिनांक १०/०४/१९७८ रोजीच्या आदेशान्वये जमीनधारकाचे अतिरिक्त क्षेत्र कमी झाल्याने काही भूमिहिनांना वाटप केलेल्या जीमनीचे वाटप रद्द झाले आहे व सदरचे क्षेत्र मुळ जमीन धारकास परत करणे क्रमप्राप्त आहे. त्यामुळे वाटप रद्द करण्यात आलेल्या भूमिहिनांना पुन्हा सदरचे क्षेत्र वाटप करता येणार नाही.

---

**सोनापुर (ता.राजुरा,जि.चंद्रपुर) येथे दहा पेक्षा अधिक व्यक्तीच्या नावाने बनावट संगणीकृत सात बारा करून मुळ मालकाची फसवणूक केल्याबाबत**

**(२३) ११३६४५ (२७-०३-२०१८). ॲड.संजय धोटे (राजूरा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोनापुर तलाठी सज्जा हद्दीतील भेंडवी, भुरकुंडा, पाचगांव (ता.राजुरा,जि.चंद्रपुर) या गावातील सर्वे नं. ७५, १०४, २, १९, ३०९, ३२६, ४ व ८३ या शेतजमीनीत दहा पेक्षा अधिक व्यक्तीच्या नावाने बनावट संगणीकृत सात बारा करून मुळ मालकाची फसवणूक केल्याचे दिनांक २७ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निर्दशनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार या प्रकरणातील दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१३-११-२०१८) :**(१) अशी बाब निदर्शनास आलेली नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**लातूर जिल्हयात अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतक-यांना नुकसान भरपाई देण्याबाबत**

**(२४) ११४८९१ (०४-०४-२०१८). श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्हयात माहे ऑगस्ट-सप्टेंबर २०१६ मध्ये झालेल्या प्रचंड अतिवृष्टीत नुकसान झालेल्या ४५४४०७ शेतकऱ्यांच्या शेतीपिकांचे नुकसानीपोटी नैसर्गिक आपत्ती अंतर्गत ३४४ कोटी १७ लक्ष रुपयांची जिल्हाधिकारी लातूर यांच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने नुकसान भरपाई एक महिन्यात शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करण्याची घोषणा मा.मदत व पुनर्वसन राज्यमंत्री यांनी दिनांक ११ ऑगस्ट, २०१७ रोजी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,सदर घोषणेच्या अनुषंगाने शासनाकडून शेतकऱ्यांना नुकसानीची मदत देण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, घोषणा करूनही सदर नुकसानभरपाई शेतकऱ्यांना शासनाने आजतागायत न देण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत तसेच सदर मदत शेतक-यांना त्वरित देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१५-११-२०१८)** :(१) होय.
(२) व (३) माहे एप्रिल ते नोव्हेंबर २०१६ या कालावधीत झालेल्या अतिवृष्टी व अवेळी पावसामुळे लातूर जिल्हयात झालेल्या शेतीपिकांच्या नुकसानीसाठी बाधित शेतकऱ्यांना मदत देण्यासाठी जिल्हाधिकारी लातूर यांच्याकडून रु. ५५२१.७२ लक्ष रुपयांचा मदतीचा सुधारीत प्रस्ताव शासनास प्राप्त झाला.

त्यानुसार शासन निर्णय दिनांक २०.०७.२०१८ अन्वये माहे एप्रिल ते नोव्हेंबर २०१६ या कालावधीत झालेल्या अतिवृष्टी व अवेळी पावसामुळे लातूर जिल्हयात झालेल्या शेतीपिकांच्या नुकसानीसाठी बाधित शेतकऱ्यांना मदत देण्यासाठी रु. रु. ५५२१.७२ लक्ष एवढा निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. सदर निधी बाधित शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर वितरित करण्याची कार्यवाही संबंधित तहसीलदारांच्या स्तरावर सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### नाशिक येथील मध्यवर्ती कारागृहातील शासकीय इमारतींच्या दुरुस्तींच्या कामांबाबत

**(२५) ११६१०२ (१२-०४-२०१८). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक येथील मध्यवर्ती कारागृहातील शासकीय इमारतींवर प्रत्येक आर्थिक वर्षामध्ये विशेष दुरुस्ती व किरकोळ दुरुस्तीवर मोठ्या प्रमाणात खर्च केला जात आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अशा प्रकारे दुरुस्ती व किरकोळ दुरुस्ती करतांना शासनाच्या निधीचा विनीयोग हा योग्यरित्या केला जात आहे काय,
(३) असल्यास, माहे एप्रिल २०१४ ते माहे जानेवारी २०१८ अखेर पर्यंत सदरहु दुरस्तीच्या कामांवर अद्यापपर्यंत झालेल्या खर्चाचा तपशील काय आहे,
(४) तसेच शासनाच्या निधीचा विनीयोग हा योग्यरित्या केला जात नसल्यास याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०३-११-२०१८) :** (१) नाही.
(२) होय.

(३) एप्रिल २०१४ ते जानेवारी २०१८ दुरुस्तीच्या कामांवर झालेल्या खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| १. सन २०१४-१५ | रु.४९.९५ लक्ष |
| २. सन २०१५-१६ | रु.३७.९६ लक्ष |
| ३. सन २०१६-१७ | रु.२७.३५ लक्ष |
| ४. सन २०१७-१८ | रु.३२.८८ लक्ष |

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही

---

## पुणे येथे वाहन खरेदीसाठी आलेल्या ग्राहकांकडून अतिरिक्त शुल्क आकारले जात असल्याबाबत

**(२६) ११६६४८ (०१-०८-२०१८). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथे वाहन खरेदीसाठी आलेल्या ग्राहकांकडून आरटीओ टॅक्स आणि रजिस्ट्रेशन चार्जेस शिवाय अन्य प्रकारचे शुल्क अनियमितपणे आकारले जात असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे शहरातील जवळपास ७५ वितरकांकडून "आरटीओला पैसे द्यावे लागतात' असे कारण सांगून वितरक ग्राहकांना हॅन्डलिंग चार्जेसच्या नावाखाली शुल्क आकारत असल्याबाबतचे वृत्त "सकाळ'ने सलग दोन दिवस प्रसिद्ध केले असल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, काही वितरक "आरटीओ हॅन्डलिंग चार्जेस' किंवा "लॉजिस्टिक चार्जेस' या नावाने जादा शुल्क वसुली करीत असल्याचे निदर्शनास येत असतांनाही संबंधित प्रशासनाकडून कार्यवाही होत नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार दोषींवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१५-११-२०१८) :**(१)व (२) या संदर्भात दैनिक सकाळ या वृत्तपत्रामध्ये वृत्त प्रसिध्द झाले हे खरे आहे.

(३) व (४) दैनिक सकाळ या वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्य बामतीच्या अनुषंगाने प्रादेशिक परिवहन अधिकारी,पुणे यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील वृत्तपत्रात नमूद दोन वितरकांना हॅन्डलींग चार्जेस आकारण्याबाबत त्यांचे स्तरावरून कारणेदाखवा नोटीस बजावण्यात आली होती. त्यांनुषंगाने त्यांनी हॅन्डलींग चार्जेसच्या नावाखाली प्रादेशिक परिवहन अधिकारी यांना देण्याकरीता पैसे आकारत नसल्याचा खुलासा केला आहे.

अतिरिक्त नोंदणी शुल्क आकरले जात असल्याबाबात वाहनांच्या नोंदणीसाठी ग्राहकांकडून विहित शुल्काव्यतिरिक्त कोणतेही जादा शुल्क न आकरण्याबाबत शासन परिपत्रक दि.१४.११.२०१८ अन्वये सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

हॅन्डलींग चार्जेस अथवा तत्सम स्वरूपात अतिरिक्त रक्कम अधिकृत विक्रते घेत असल्याबाबत प्रादेशिक परिवहन कार्यालय, पुणे यांचेकडे कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही

---

**मौजे वीर-देवपाट-रानपाट (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) ते पेढांबे (ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी) हा रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागाकडे हस्तांतरीत करण्याबाबत**

**(२७) ११६६७१ (२०-०७-२०१८). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे वीर-देवपाट-रानपाट (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) ते पेढांबे (ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी) हा रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागाकडे हस्तांतरित करून रस्त्याच्या दुरूस्तीसाठी तातडीने निधी मंजूर करण्यात येईल असे आश्वासन मा. मंत्री, सार्वजनिक बांधकाम यांनी दि. १९ मार्च, २०१८ रोजी वा त्या सुमारास दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मा. मंत्री महोदयांच्या आश्वासनाप्रमाणे सदर रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वर्ग करून त्यासाठी निधी मंजूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०३-११-२०१८) :**(१) होय.
(२) सदरचा रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वर्ग करण्याची कार्यवाही सुरू आहे. त्यानंतर निधी, निकष व मंजुरीच्या अधीन राहून काम हाती घेण्यात येईल.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील अनुसूचित जाती जमातीच्या महाविद्यालयीन शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची रक्कम मिळाली नसल्याबाबत**

**(२८) ११७१७८ (०२-०८-२०१८). ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.बळीराम सिरसकार (बाळापूर), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनुसूचित जाती जमातीच्या महाविद्यालयीन शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना सन २०१७-२०१८ या शैक्षणिक वर्षाची शिष्यवृत्तीची रक्कम अद्याप मिळालेली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त शिष्यवृत्तीची रक्कम १४ एप्रिल, २०१८ पर्यंत न मिळाल्यास राज्यव्यापी तीव्र आंदोलन करण्याचा इशारा स्टुंडट फेडरेशन ऑफ इंडिया या विद्यार्थी संघटनेने शासनाला दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शिष्यवृत्तीची रक्कम संबंधित विद्यार्थ्यांना देण्याकरीता शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (१९-११-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) सन २०१७-१८ मध्ये महाडिबीटी पोर्टल पुर्णपणे कार्यान्वित होवू न शकल्याने पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज ऑफलाईन स्विकारुन त्यांचे शैक्षणिक लाभ त्यांच्या आधारसंलग्न बॅन्क खात्यावर अदा करण्याचा निर्णय दिनांक २९.१.२०१८ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला. तद्नंतर, मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने याचिका क्र.४०८/२०१८ मध्ये दिलेल्या निर्णयानुसार सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षामध्ये, ज्या महाविद्यालय/शैक्षणिक संस्थांना संबंधित विभागांकडील मागासप्रवर्ग (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती, इतर मागासप्रवर्ग व विशेष मागासप्रवर्ग) आणि आर्थिकदृष्ट्या मागासप्रवर्गातील विद्यार्थ्यांची शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्काची रक्कम अद्याप प्राप्त होवू शकलेली नाही, अशा महाविद्यालय/ शैक्षणिक संस्थांना, त्यांच्याकडील प्रवेशित पात्र मागासवर्गीय विद्यार्थ्यांपैकी आज (दिनांक १८.५.२०१८) अखेर लाभ अदा केलेले विद्यार्थी वगळुन, उर्वरीत विद्यार्थ्यांची अनुज्ञेय/पात्र अभ्यासक्रमांसाठी देय होणारी शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्काची रक्कम संबंधित महाविद्यालय/शैक्षणिक संस्थेला खालील अटी/शर्तीवर ऑफलाईन पध्दतीने अदा करण्याचा निर्णय दिनांक १७.५.२०१८ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला व त्याची अंमलबजावणी सर्व संबंधित विभागांकडून करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्याच्या ग्रामीण भागातील जमीनींचे ई-डिजिटलायझेशन करण्याबाबत.**

**(२९) ११८९३० (२०-०७-२०१८). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्याची वाढती लोकसंख्या, शहरीकरण, औद्योगिकीकरण, जमीनीचे हस्तांतरण व अनेक ठिकाणी जमीनीचे तुकडे झाल्यामुळे भूमिअभिलेख नकाशा व वहिवाट अधिकार अभिलेख नकाशा यात तफावत आल्याने शासनाने ग्रामीण भागातील जमीनींच्या नकाशांची पुनर्मोजणी व भूमापण तसेच ई-डिजिटलायझेशन करण्याचा २ वर्षापूर्वी निर्णय घेतला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सॅटेलाईटच्या माध्यमातून हायब्रीड तंत्रज्ञानाचा वापर करुन किती जिल्हा व तालुक्यातील जमीनीची पुनर्मोजणी करण्याबाबत व भूभागाच्या नकाशाचे ई-डिजिटलायझेशन करण्याबाबत कार्यवाही पूर्ण केली आहे व किती जिल्ह्यांची बाकी आहे,
(३) असल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१७-११-२०१८) :**(१), (२) व (३) महसूल व वन विभागाच्या दिनांक ०६.१०.२०१५ च्या शासन निर्णयान्वये राज्यातील ग्रामीण भागातील जमिनींची पुनर्मोजणी करणे आणि भूमापन नकाशांचे डिजीटायझेशन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सदर शासन निर्णयानुसार पहिल्या टप्प्यातील पुणे, रायगड, नाशिक, औरंगाबाद, अमरावती व नागपूर या ६ जिल्ह्यात पुनर्मोजणीची कार्यवाही सुरू करण्यास मान्यता दिलेली आहे. त्यानुषंगाने या ६ जिल्ह्यात पुनर्मोजणी कार्यवाही सुरू करण्यासाठीच्या निवीदा दिनांक ३१.०३.२०१७ रोजी प्रसिध्द करण्यात आल्या होत्या. पुणे व रायगड या २ जिल्ह्यांसाठी दोन वेळा मुदतवाढ देवूनही ३ पेक्षा कमी निवीदा प्राप्त झालेल्या होत्या. तथापी, ग्रामीण विकास मंत्रालय, भूमि संसाधन विभाग, नवी दिल्ली यांचेकडील परिपत्रक दिनांक ०८.१२.२०१६ नुसार पुनर्मोजणीसाठी केंद्र शासनाकडून निधी मिळण्याची शक्यता नसल्याने व त्यानंतर केंद्र शासनाकडून दिनांक ३१.१०.२०१७ रोजीच्या पत्रान्वये पुनर्मोजणीची कार्यवाही अनावश्यकरित्या सुरू करू नये असे कळवण्यात आले असल्याने सदरच्या निवीदा दिनांक ०९.०४.२०१८ रोजी रद्द करण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे पुनर्मोजणीची कार्यवाही प्रत्यक्षात सुरू झालेली नाही.

तसेच वर नमूद केलेल्या ६ जिल्ह्यातील भूमापन नकाशांचे डिजीटायझेशनचे काम दिनाक ०३.०५.२०१७ पासून सुरू करण्यात आलेले आहे. उर्वरित जिल्ह्यातील भूमापन नकाशांच्या डिजीटायझेशनचे काम करण्यासाठी जमाबंदी आयुक्त यांच्याकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने आवश्यक निधी उपलब्ध करुन घेण्याच्या दृष्टीने पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

---

**विदर्भातील सर्व नझुल जमिनी भाडेपटटायुक्त करण्याबाबत**

**(३०) ११९४०६ (२०-०७-२०१८). श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.नसीम खान (चांदिवली), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील जरीफटका व खामला येथील नझुल जमिन भाडेपटटा युक्त करण्याचा निर्णय शासनाने घेतला असून सदर निर्णय संपूर्ण विदर्भासाठी लागू करावा अशी मागणी करण्यात आली आहे , हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीनुसार विदर्भातील सर्व नझुल जमिनी भाडेपटटायुक्त करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रकांत पाटील (१३-११-२०१८)** :(१), (२) व (३) अशा स्वरूपाचे निवेदन प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. तथापि, नझूल जमिनी फ्री-होल्ड (भोगवटादार वर्ग-१) करण्यासंदर्भात अभ्यास करुन शिफारस करण्यासाठी दि.२१.१२.२०१५ च्या शासन निर्णयान्वये प्रधान सचिव (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीने आपला अहवाल शासनास सादर केला असून तत्संबंधी पुढील कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**तहसिल कार्यालय, पनवेल (जि.रायगड) येथील किओसक मशिन सुरू करण्याबाबत**

**(३१) १२०३०१ (२०-०७-२०१८). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तहसिल कार्यालय, पनवेल (जि.रायगड) येथे सातबारा मिळण्यासाठी बसविण्यात आलेले किओसक मशिन आठ महिन्यापासून बंद असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मशिनव्दारे २३ रूपयांची रोख रक्कम किंवा ऑनलाईन पैसे भरल्यास तीन मिनिटात सातबारा दाखला शेतक-यांना मिळत होता परंतु गत ८ महिन्यांपासून संबंधीत अधिका-यांच्या दुर्लक्षितपनामुळे मशिन बंद असून त्यामुळे शेतक-यांना सातबारा मिळण्यात अडचणी निर्माण होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी करून तहसिल कार्यालयातील किओसक मशिन त्वरीत सुरू करण्याबाबत तसेच या प्रकरणी दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित अधिका-यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेए

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१७-११-२०१८) :** (१), (२) व (३), तहसिल, पनवेल कार्यालयात सातबारा मिळणेसाठी बसविण्यात आलेले किओसक मशिन हे मे. फिनिक्स मायक्रोसिस्टिम्स, भोसरी, पुणे यांच्याकडून जनतेस तात्काळ गा.न.नं. ७/१२ सेवा उपलब्ध होण्याच्या दृष्टिकोनातून प्रायोगिक तत्वावर कंपनीचे प्रसिध्दीकामी बसविण्यात आलेले आहे. सदरची मशीन ही केवळ नागरिकांची सोय व्हावी व मशिन कशी असावी या प्रायोगिक व पसिध्दीच्या हेतूने पनवेल तहसिल कार्यालयात बसविण्यात आली आहे.

शासनाच्या राष्ट्रीय भूमी अभिलेख आधुनिकीकरण कार्यक्रम (NLRMP) अंतर्गत गा.न.नं. ७/१२ संगणीकृत होऊन डिजीटल स्वाक्षरीयुक्त होण्याची कार्यवाही प्रगतिपथावर असून, ती पूर्ण झाल्यानंतर व स्वाक्षरीयुक्त संगणीकृत गा.न.नं. ७/१२ चे दर शासनाव्दारे निश्चित झाल्यानंतर संगणीकृत डिजीटल स्वाक्षरीकृत गा.न.नं. ७/१२ संकेतस्थळामार्फत जनतेस उपलब्ध करून देण्याचे नियोजित आहे.
(४) प्रश्नच उद्भवत नाही.

---

**नागपूर-मुंबई द्रुतगती मार्ग, जोडरस्ते व त्यावरील नवनगरांच्या आखणीमध्ये अंतर्भूत जमिनीचा प्रकार हंगामी बागायत ते बागायत असा दुरुस्त करण्याबाबत**

**(३२) १२०४५४ (२०-०७-२०१८). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर-मुंबई द्रुतगती मार्ग, जोडरस्ते व त्यावरील नवनगरांच्या आखणीमध्ये अंतर्भूत जमिनीचा प्रकार हंगामी बागायत ते बागायत असा दुरुस्त करुन मिळणेबाबत तसेच इतर बाबी विचारात घेऊन त्यासाठी वाढीव मोबदला मिळणेबाबत उपविभागीय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी, भूसंपादन, सिंदखेडराजा यांना तसेच संबधित मंत्री महोदयांना वारंवार लेखी निवेदने दिली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार व सदर निवेदनांच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१४-११-२०१८) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) उपविभागीय अधिकारी, सिंदखेड राजा यांनी प्राप्त प्रकरणांपैकी काही प्रकरणांमध्ये चौकशी पूर्ण करून प्रस्तुत प्रकल्पाकरीता खाजगी वाटाघाटीव्दारे थेट खरेदी पध्दतीने खाजगी जमिनीची खरेदी प्रक्रिया पूर्ण केली आहे. उर्वरित प्रकरणांमध्ये उपविभागीय अधिकारी यांचेस्तरावरुन चौकशी सुरू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**गव्हाण फाटा ते चिरनेर (ता.उरण,जि.रायगड) या रस्त्याची तातडीने दुरुस्ती करण्याबाबत**

**(३३) १२१०१९ (२०-०७-२०१८). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उरण (जि.रायगड) पूर्व विभागाला जोडणा-या गव्हाण फाटा ते चिरनेर या रस्त्याची मोठया प्रमाणात दुरवस्था झाल्यामुळे प्रवास करणे गैरसोयीचे झाले असून या रस्त्याची तातडीने दुरुस्ती करण्याची मागणी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे दिनांक २४ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार या रस्त्याची तातडीने दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१७-११-२०१८)** :(१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) सदर रस्त्याच्या दुरुस्तीकरीता रस्ते देखभाल दुरुस्ती अंतर्गत मार्च-२०१८ मध्ये खड्डे भरण्याचे काम पूर्ण करुन रस्ता वाहतुकीस योग्य करण्यात आला आहे.
सद्यस्थितीत शासनाच्या हायब्रीड ॲन्युईटी योजनेंतर्गत सदर रस्त्याच्या कामाच्या निविदा मंजूर असून, काम लवकरात लवकर सुरु करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मनमाड (ता.नांदगांव, जि.नाशिक) येथिल शासकीय तांत्रिक विद्यालयाची इमारत बांधण्यासाठी जमीन देण्याबाबत**

**(३४) १२१२४५ (२०-०७-२०१८). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मनमाड (ता.नांदगांव, जि.नाशिक) येथील शासकीय तांत्रिक विद्यालयाची इमारत बांधण्यासाठी मनमाड येथील भूखंड क्रमांक ६७जी/६७जे/६७आय हे भूखंड मिळण्याबाबत लेखी मागणी प्राचार्य, औद्यगिक प्रशिक्षण संस्था, नांदगांव यांनी तहसिलदार, नांदगांव यांच्याकडे दिनांक ५ जानेवारी, २०१२ रोजी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी तहसिल कार्यालय, नांदगांव यांच्याकडून कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत चौकशी करून सदर भूखंड औद्योगिक प्रशिक्षण संस्था, नांदगांव यांना देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१२-११-२०१८)** :(१) प्राचार्य, औदयोगिक प्रशिक्षण संस्था, नांदगांव यांनी शासकीय तांत्रिक विद्यालयाकरीता मनमाड येथील ६५जी/६५जे/६५ आय हे शासकीय भूखंड मिळण्याबाबत तहसिलदार,नांदगांव यांच्याकडे दिनांक ५ जानेवारी २०१२ रोजीच्या पत्रान्वये मागणी केली आहे.
(२) व (३) तहसिलदार, नांदगांव यांनी दिनांक १८.१०.२०१२ रोजीच्या पत्रान्वये उप विभागीय अधिकारी, मालेगांव यांना भूखंड क्र.६५जी/६५जे/६५आय च्या अनुषंगाने प्रस्ताव सादर केला होता. प्रकरणी उपस्थित त्रुटीपुर्ततेच्या अनुषंगाने तहसिलदार नांदगांव यांनी दि.१२.१०.२०१८ च्या पत्रान्वये सादर केलेला फेरप्रस्ताव उपविभागीय अधिकारी, येवला उपविभाग यांनी अपर जिल्हाधिकारी, मालेगांव यांना दिनांक १५.१०.२०१८ रोजी सादर केला. मात्र प्रस्तावित जागा मनमाड नगरपरिषदेचे कत्तलखाना, खेळाचे मैदान व विरशैव लिंगायत समाज व गोसावी समाज यांच्या दफनभूमीसाठी आरक्षित असल्याने व सदर जागेवरील आरक्षण वजा जाता उर्वरीत क्षेत्र तांत्रिक विद्यालयाकरीता पुरेसे नसल्यामुळे, शासकीय तांत्रिक विदयालय, मनमाड

साठी देता येत नसल्याचे अपर जिल्हाधिकारी, मालेगांव यांनी दिनांक १९.१०.२०१८ च्या पत्रान्वये प्राचार्य, औदयोगिक प्रशिक्षण संस्था, नांदगांव यांना कळविले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अकोला व वाशिम जिल्हाधिकारी कार्यालयातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(३५) १२१४७४ (२०-०७-२०१८). श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला व वाशिम जिल्हाधिकारी कार्यालयातील सरळसेवा आणि पदोन्नतीच्या एकूण पदांपैकी शंभरपेक्षा अधिक पदे रिक्त असल्याचे माहे मे,२०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरच्या रिक्त पदांमुळे सदर कार्यालयांकडून नागरीकांना विविध सेवा पुरविण्यास विलंब होत असून त्यामुळे इतर कर्मचारी तसेच नागरिकांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत चौकशी करून उक्त कार्यालयातील रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०५-११-२०१८) :**
(१), (२) व (३)अकोला जिल्हाधिकारी कार्यालयातील पदांचा तपशिल पुढील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | गट | मंजूर पदे | कार्यरत पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|
| १ | अ | २७ | २१ | ६ |
| २ | ब | ५३ | ४४ | ९ |
| ३ | क | ६९३ | ६४१ | ५२ |
| ४ | ड | ११७ | ८३ | ३४ |
| | एकूण | ८९० | ७८९ | १०१ |

वाशिम जिल्हाधिकारी कार्यालयातील पदांचा तपशिल पुढील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | गट | मंजूर पदे | कार्यरत पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|
| १ | अ | २५ | १७ | ८ |
| २ | ब | ४६ | ४२ | ४ |
| ३ | क | ६०३ | ५४२ | ६१ |
| ४ | ड | ७५ | ६९ | ६ |
| | एकूण | ७४९ | ६७० | ७९ |

रिक्त पंदामुळे नागरिकांना विविध सेवा पुरविण्यास विलंब तसेच कर्मचारी/नागरिकांची गैरसोय होणार नाही यांची जिल्हा प्रशासनामार्फत खबरदारी घेण्यात येत आहे.

पदोन्नतीच्या कोट्यातील रिक्त पदे पदोन्नतीने तसेच वित्त विभाग शासन निर्णय क्र.संकीर्ण २०१५/प्र.क्र.४१/अर्थ- १, दि. ०२ जून, २०१५ मधील तरतुदीनुसार सरळसेवेच्या कोट्यातील रिक्त पदांपैकी ५० टक्के  किंवा एकूण संवर्गाच्या ४ टक्के यापैकी जे कमी असेल तेवढी पदे सरळसेवेने भरण्याचे संकल्पित आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्य परिवहन महामंडळाने प्रवासी भाडेवाढीचा प्रस्ताव सादर केल्याबाबत**

**(३६) १२२२१३ (२४-०७-२०१८). श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डिझेलची गेल्या दिड महिन्यात तब्बल ८ रुपयांनी दरवाढ झाल्याने एसटी महामंडळाला रोज ९७ लाखांचे नुकसान झाल्याने ही नुकसान भरपाई भरुन काढण्यासाठी महामंडळाने १० ते १५ टक्के प्रवासी भाडेवाढीचा प्रस्ताव माहे मे, २०१८ रोजी वा त्यादरम्यान तयार केला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ही भाडेवाढ केव्हापासून लागु करण्यात येणार आहे,

(३) असल्यास, या प्रस्तावावर शासनाने निर्णय घेतला आहे काय, त्याचे स्वरुप काय आहे ?

**श्री. दिवाकर रावते (२०-११-२०१८) :** (१) राज्य परिवहन महामंडळाने यापूर्वी दि.२२ ऑगस्ट, २०१४ मध्ये प्रवास भाडयात वाढ केली होती. आपोआप भाडेवाढ सुत्रात नमूद केल्यानुसार डिझेल, टायर संच, चॅसीज, वेतन वाढ व महागाई भत्त्याच्या दरात वाढ झाल्यास राज्य परिवहन महामंडळास प्रवास भाडयात वाढ करण्यासाठी परवानगी देण्यात आली आहे.

दि.२२ ऑगस्ट, २०१४ ते दि.०१ जून, २०१८ या कालावधीत डिझेल, टायर संच, चॅसीज व महागाई भत्त्यात झालेल्या वाढीमुळे दि.१२ जून, २०१८ रोजी राज्य परिवहन प्राधिकरण यांचेकडे १८ टक्के प्रवासी भाडेवाढीचा प्रस्ताव सादर केला होता.

(२) राज्य परिवहन महामंडळाने दि.१६ जून, २०१८ पासून प्रवासी भाडयात १८ टक्के वाढ केली आहे.

(३) दि.१२ जून, २०१८ रोजी पाठविलेल्या प्रस्तावास दि.१५ जून, २०१८ रोजी राज्य परिवहन प्राधिकरणाने मान्यता दिली. तसेच शासनाने उक्त प्रस्तावास दि.१८ जुलै, २०१८ रोजी १८ टक्के भाडेवाढीस मान्यता दिली.

---

**भूगाव (ता.कामटी, जि.नागपूर) येथील महिलेचे त्यांच्या जमिनीच्या सातबाऱ्यावर नाव लावण्याबाबत**

**(३७) १२२७५४ (२०-०७-२०१८). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भूगाव (ता.कामटी, जि.नागपूर) येथील कमलाबाई कुबडे ही महिला गत तेरा वर्षापासून जमिनीच्या मालकी हक्कासाठी संघर्ष करत असून त्यांच्या जमिनीच्या सात बाऱ्यावर नियमानुसार त्यांचे नाव लावण्यात यावे असे आदेश उपविभागीय अधिकाऱ्यांनी दिले आहे , हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान मा.महसूल मंत्र्याच्या दालनात युक्तिवाद झाल्यानंतरही त्यांना मंत्रालयातून आदेशाची प्रत अद्याप देण्यात आली नसल्याचे दिनांक ३० मे, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी तातडीने कार्यवाही करून कमलाबाई कुबडे यांच्या जमिनीच्या सात बाऱ्यावर नियमानुसार त्यांचे नाव लावण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१३-११-२०१८) :**(१), (२) व (३) श्रीमती कमलाबाई भाऊरावजी कुबडे व इतर विरूध्द श्री. ईश्वर भाकरू सोमनाथे व इतर या प्रकरणी मौ.भूगाव, ता.कामटी, जि. नागपूर येथील सर्व्हे क्र.२१२ आराजी ०.८२ हे.आर. या जमिनीच्या राजस्व अभिलेखामध्ये गैरअपिलार्थीचे नाव कमी करून अपिलार्थीचे नाव नोंदविण्यात यावे व तसा सुधारीत गा.न.न.७/१२ व राजस्व अभिलेख देण्यात यावा, असे आदेश उपविभागीय अधिकारी, मौदा, जि.नागपूर यांनी दि.२०.११.२०१४ रोजी पारित केले.

प्रस्तुत प्रकरणाबाबत मा. मंत्री (महसूल) यांचे न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या श्री.संजय गोवर्धन डागा आणि इतर विरूध्द अपर आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर व इतर या प्रकरणी मा. मंत्री (महसूल) यांनी दि.२६.०७.२०१८ रोजी आदेश पारित केले आहेत. सदर आदेशांनूसार अर्जदार श्री.संजय गोवर्धन डागा आणि इतर यांचा फेरतपासणी अर्ज फेटाळण्यात आला असून सदर आदेश संबंधितांना बजावण्याबाबत दि.३०.०७.२०१८ च्या शासन पत्रान्वये अपर आयुक्त, नागपूर व जिल्हाधिकारी, नागपूर यांना कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात डिजिटल स्वाक्षरीकृत ७/१२ उतारे देण्याची घोषणा केल्याबाबत**

**(३८) १२२७७८ (२०-०७-२०१८). श्री.हनुमंत डोळस (माळशिरस) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय भूमी-अभिलेख आधुनिकीकरण कार्यक्रमांतर्गत दिनांक १ ऑगस्ट पासून राज्यात डिजिटल स्वाक्षरीकृत ७/१२ उतारे देण्याची घोषणा मा.मुख्यमंत्री यांनी माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सोलापूर जिल्हयात पहिल्या टप्प्यात किती उताऱ्यांवरील डिजिटल स्वाक्षरीचे काम पूर्ण करण्यात झाले व किती काम अपूर्ण आहे,
(३) असल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१७-११-२०१८)** :(१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) सोलापूर जिल्ह्यामध्ये एकूण ११,६८,७३६ इतके सर्व्हे क्रमांक असून त्यापैकी एकूण २,०३,८६१ इतक्या सर्व्हे क्रमांकाचे डिजीटल स्वाक्षरीकृत स्वाक्षरीचे काम पूर्ण झाले आहे. परंतु स्टेट डेटा सेंटरवरिल सर्व्हरमध्ये तांत्रिक अडचणीमुळे सोलापूर जिल्ह्यातील उर्वरीत सर्व्हे क्रमांक डिजीटल स्वाक्षरीयुक्त उतारा तयार करण्याचे कामकाज दिनांक २९.०५.२०१८ पासून बंद आहे. स्टेट डाटा सेंटर वरून गा.नं.न. ७/१२ चा डाटा क्लाऊडला स्थानांतरित करण्याच्या दृष्टीने कार्यवाही सुरू आहे. सदर कार्यवाही पूर्ण होताच उर्वरित कामकाज पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

---

**उस्मानाबाद जिल्हयामध्ये ऑनलाईन सातबारा मिळत नसल्याबाबत**

**(३९) १२२८२५ (२०-०७-२०१८). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये गत अनेक दिवसांपासून सर्व्हर हँग होणे अथवा संकेतस्थळ बंद पडणे इत्यादी कारणाने ऑनलाईन सातबारा मिळत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे सर्वसामान्य शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत चौकशी करून शेतकऱ्यांना ऑनलाईन सातबारा उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रकांत पाटील (१७-११-२०१८)** :(१), (२) व (३) सर्व्हरमधील तांत्रिक अडचणींमुळे येणारे अडथळे दुर करण्यासाठी स्टेट डेटा सेंटरवरील ८ जिल्ह्यांचा डाटा BSNL Cloud व ६ जिल्ह्यांचा डाटा NDC पुणे येथील सर्व्हरवर स्थानांतरीत करण्यात आला आहे. त्यामुळे सद्यस्थितीमध्ये गा.न.नं. ७/१२ संगणकीकरणाचे काम सुरळीतरीत्या सुरु असून mahabhulekh. maharashtra. gov. in या संकेतस्थळावर सर्व जिल्ह्यांचे गा.न.नं. ७/१२ पहाण्यासाठी उपलब्ध होत आहे. त्याचबरोबर डिजीटल स्वाक्षरीयुक्त ४० लाख गा.न.नं.७/१२ ही जनतेला डाऊनलोड करण्यासाठी aapleabhilekh. mahabhumi. gov. in/satbara या

संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. उस्मानाबाद जिल्ह्यामधील ९२% गा.न.नं. सातबाराचे डिजिटल स्वाक्षरीचे काम पुर्ण झाले आहे. एक लाखा पेक्षा अधीक डिजिटल स्वाक्षरीयुक्त गा.न.नं. ७/१२ हे खातेदारांनी डाऊनलोड केले आहेत. तसेच तांत्रिक अडचणींमुळे किंवा सर्व्हेर बिघाडामुळे जनतेची गैरसोय होऊ नये म्हणून संगणकीकृत ७/१२ च्या PDF प्रती तलाठी यांच्या लॉगीनला उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. त्यामुळे संगणकीकृत गा.न.नं. ७/१२ ची नक्कल उपलब्ध करुन देण्यास कोणतीही अडचण आलेली नाही. सध्या गा.न.नं. ७/१२ उपलब्ध होण्यामध्ये कोणतीही अडचण राहीलेली नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वसई (जि.पालघर) तालुक्यातील विविध गावातील तलाठी कार्यालयात उपस्थित राहत नसल्याबाबत

**(४०) १२२९७५ (२०-०७-२०१८). श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धोवली, मालोंडे, गोखिवरे, वालीव, संडोर, सालोली, कोफराड, कौलार, आगाशी व अर्नाळा (ता.वसई, जि.पालघर) या गावातील तलाठी त्यांच्या कार्यालयात उपस्थित राहत नसल्यामुळे वैद्यकीय मदतीसाठी आवश्यक असलेले उत्पन्नाचे दाखले मिळत नसल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त गावातील रुग्णांना तातडीने उत्पन्नाचे दाखले देऊन त्यांची गैरसोय दूर करण्याबाबत तसेच संबंधित तलाठ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०८-११-२०१८) :** (१) तलाठी उपलब्ध नसल्यामुळे उत्पनाच्या दाखल्यांसाठी रुग्णांची परवड या आशयाची बातमी दि.२१.०४.२०१८ रोजी वसई तालुक्यातील एका स्थानिक वर्तमानपत्रात प्रसिध्द झाली होती.
(२) व (३) एप्रिल-२०१८ ते मे-२०१८ च्या दरम्यान पालघर जिल्ह्यात लोकसभा पोटनिवडणूकींच्या कामासाठी तलाठ्यांच्या नेमणूका करण्यात आल्यामुळे तसेच सदर कालावधीत जिल्हाधिकारी, पालघर यांच्या आदेशानुसार सर्व शासकीय व वन जमिनीवरील अतिक्रमण शोध मोहिम सुरु असल्यामुळे धोवली, मालोंडे, गोखिवरे, वालीव, संडोर, सालोली, कोफराड, कौलार, आगाशी व अर्नाळा या गावातील तलाठी हे कार्यालयात उपस्थित नसल्याची शक्यता आहे.

मात्र, सदर कालावधीत वैद्यकीय कारणास्तव आवश्यक असलेले उत्पन्नाचे दाखले देण्यात आलेले असून कोणत्याही प्रकारचे वैद्यकीय कारणास्तव लागणारे उत्पन्नाचे दाखले प्रलंबित नाहीत. याव्यतिरीक्त, सर्व दाखल्यांसाठी “एक दिवसीय दाखले शिबीरे” आयोजित करुन दाखले तात्काळ मिळण्याची सुविधाही उपलब्ध करुन देण्यात आलेली होती.

प्रस्तुत प्रकरणी वैद्यकीय कारणास्तव लागणारे उत्पन्नाचे दाखले तात्काळ देण्याबाबत सर्व तलाठी व मंडळ अधिकारी यांना सूचनाही देण्यात आलेल्या आहेत.

---

**पालखेड (ता.वैजापूर, जि.औरंगाबाद) येथील शेतकरी समृध्दी महामार्गासाठी होणा-या भुसंपादनास विरोध करीत असल्याबाबत**

**(४१) १२३३४४ (२०-०७-२०१८). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालखेड (ता.वैजापूर, जि.औरंगाबाद) येथील शेतकरी समृध्दी महामार्गासाठी करण्यात येणाऱ्या भुसंपादनास विरोध करीत असून येथील शेतक-यांनी गावातील क्षेत्र व दर याबाबत झालेल्या संयुक्त मोजणीची त्रयस्थांमार्फत चौकशी करण्याची मागणी विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांच्याकडे निवेदन देऊन केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने पालखेड गावातील क्षेत्र व दर याबाबत झालेल्या संयुक्त मोजणीची चौकशी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१४-११-२०१८) :**(१) होय.

(२) महाराष्ट्र समृध्दी महामार्गाकरीता जमिनी खरेदी करण्याच्या प्रक्रीये विरुध्द पालखेड ता. वैजापूर, जि.औरंगाबाद येथील शेतकऱ्यांनी दिलेल्या निवदेन / तक्रारींवर कार्यवाही करण्यासाठी विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांनी उप विभागीय अधिकारी, वैजापूर यांना आदेशीत केले होते.

उप विभागीय अधिकारी यांनी सर्व तक्रारींची चौकशी करुन सदर तक्रारींचे निराकरण केलेले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई-अहमदाबाद महामार्गावर तांदुळवाडी घाटातील धोकादायक वळणांवर संरक्षक कठडे बांधण्याबाबत.**

**(४२) १२३६१६ (२०-०७-२०१८). श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील मुंबई-अहमदाबाद महामार्गावर वरई फाट्याच्या पुढे पारगाव पुलापासून जवळच असलेल्या तांदुळवाडी घाटातील धोकादायक वळणांवर संरक्षक कठडे बांधण्याबाबतची मागणी त्या भागातील नागरिकांकडून व पर्यटकांकडून गत अनेक वर्षापासून केली जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार सदर महामार्गावर संरक्षक कठडे बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१७-११-२०१८)** :(१) हे खरे नाही.

त्या भागातील नागरीकांकडून व पर्यटकांकडून लेखी निवेदन प्राप्त झालेले नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) तांदुळवाडी घाटात काही ठिकाणी सुचनाफलक व ॲन्टी क्रॅश बॅरीअर बसविण्यात आलेले असून घाटातील उर्वरित काही अपघातप्रवण स्थळांच्या ठिकाणी संरक्षक भिंत/ॲन्टी क्रॅश बॅरीअर बसविण्याचे काम मंजुरी, निधी, निकष व प्राथाम्यक्रमानुसार हाती घेण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कर्जत (जि.रायगड) ते कल्याण(जि.ठाणे) या रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत**

**(४३) १२४०२६ (२०-०७-२०१८). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्जत (जि.रायगड) ते कल्याण (जि.ठाणे) या रस्त्याची दूरवस्था झाल्यामुळे रस्त्यावरून प्रवास करणे गैरसोयीचे झाल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार उक्त रस्त्याची तातडीने दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१७-११-२०१८)** :(१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) सदर रस्ते डिसेंबर, २०१७ मध्ये खड्डे भरण्याचे काम पूर्ण करुन रस्ता वाहतुकीस सुस्थितीत ठेवण्यात आला होता. त्यानंतर पावसाळयादरम्यान अतिवृष्टीमुळे नव्याने पडलेले खड्डे भरुन रस्ता वाहतुकीस सुस्थितीत ठेवण्यात आला आहे.

सद्यस्थितीत रस्त्याचे काम शासनाच्या हायब्रिड ॲन्युईटी योजनेतंर्गत मंजूर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक जिल्ह्यातील देवळा तालुक्यातील खरडे येथील निवाने बारीघाट रस्त्याची दुरवस्था झाल्याबाबत.**

**(४४) १२४९७८ (२३-०७-२०१८). डॉ.राहूल आहेर (चांदवड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यातील देवळा तालुक्यातील खरडे येथील निवाने बारीघाट रस्त्याची दुरावस्था झाली असून या रस्त्याची त्वरित दुरुस्ती करण्याची मागणी परिसरातील नागरिकांनी केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रस्त्यावर अनेक ठिकाणी खड्डे असल्याने व संरक्षक भिंती नसल्याने अपघाताची शक्यता वाढली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू रस्त्याची तातडीने दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१७-११-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.

प्रश्नांकित रस्त्यावरील घाटातील लांबी क्षतिग्रस्त झाली आहे.

(२) हे खरे आहे.

(३) मुलुकवाडी ते निवाणेबारी ग्रामा-६९ या रस्त्याची सुधारणा करण्याचे काम सन २०१८-१९ मध्ये आदिवासी विकास विभागांतर्गत अर्थसंकल्पात मंजूर असून तांत्रिक मान्यता, निविदा निश्चिती करून सुरू करण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**तहसीलदार हदगांव (जि.नांदेड) यांच्यावर कारवाई करण्याबाबत**

**(४५) १२५२३१ (२०-०७-२०१८). श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे वायफना (खुर्द) (ता.हदगांव, जि.नांदेड) येथील उपसरपंच संतोष लक्ष्मण माने यांनी हदगांव तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांच्या कार्यशैलीला वैतागून माहे जून, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान आत्महत्येचा प्रयत्न केला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपसरपंच श्री.माने यांनी गत तीन वर्षापासून वडिलांच्या नावे असलेली जमीन त्यांच्या नावे करण्याबाबत अर्ज देऊनही कोणतीही कार्यवाही संबंधीत तहसिलदारांकडून करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रस्तुत प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार संबंधित तहसीलदारावर कारवाई करून जमीन संबंधिताच्या नावे करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०३-११-२०१८) :** (१), (२), (३) व (४) श्री.संतोष लक्ष्मण माने यांनी दि.०६.०७.२०१६ रोजी जमिनीचा वारसा फेरफार नोंद घेण्यासाठी तलाठी सज्जा घोगरी यांचेकडे अर्ज दाखल केला होता. महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ चे कलम १४९ नुसार तलाठी सज्जा घोगरी यांनी हितसंबंधीतांना नोटीस बजावली असता श्री.रोहिदास मोतीराम माने यांनी लेखी तक्रार नोंदविल्यावरुन सदर विवादग्रस्त प्रकरणामध्ये नायब तहसिलदार, हदगांव यांनी दि.१३.०६.२०१८ रोजी आदेश पारित केले आहेत.
त्यानुसार, श्री.संतोष लक्ष्मण माने यांचे म्हणणे मान्य करुन त्यांनी दाखल केलेला न्यायप्रविष्ठ दिवाणी दावा क्र.१५३/२०१३ नुसार दिलेल्या वारसा प्रमाणपत्राआधारे वारसा फेरफार रितसर नोंदवून घेण्याचे आदेश दिले आहेत. यावरुन श्री.संतोष माने यांनी जून, २०१८ च्या सुमारास केलेला आत्महत्येचा प्रयत्न तहसिलदार यांच्या कार्यशैलीला वैतागून केल्याचे निदर्शनास आले नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर अत्याधुनिक अडथळे बसविण्याबाबत

**(४६) १२५२५९ (२०-०७-२०१८). श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.नारायण कुचे (बदनापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर गत काही वर्षात दुभाजक ओलांडून रस्त्याच्या विरुद्ध दिशेला वाहने जाऊन अनेक अपघात घडल्यामुळे वाहनांनी मार्गिका सोडून जाऊ नये यासाठी अत्याधुनिक अडथळे (डिवायडर) बसविण्यात येत असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबतची कार्यवाही किती कालावधीत पूर्ण करण्यात येणार आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१४-११-२०१८) :**(१) होय खरे आहे.

मुंबई-पुणे द्रुतगती मार्गाच्या दोन्ही वाहिन्यांच्या दोन्ही बाजूस असलेल्या अस्तित्वातील मेटल बीम क्रॅश बॅरीअर व हाय टेन्साईल स्टील फ्लेक्झीबल वायर रोप सेफ्टी बॅरीअर बसविलेली लांबी वगळून उर्वरित सर्व लांबीमध्ये शोल्डर बाजूला डब्ल्यु मेटल बीम क्रॅश बॅरीअर व मिडीयन बाजूला थ्राय मेटल बीम क्रॅश बॅरीअर बसविणेचे काम सध्या प्रगतीत आहे.
(२) सदर कामाचे कार्यारंभ आदेश दि.२२.०१.२०१८ रोजी देण्यात आले असून काम पूर्ण करण्याची मुदत १२ महिने आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### वैभववाडी (जि. सिंधुदुर्ग) तालुक्यात रस्त्याची निकृष्ट दर्जाची कामे केल्याबाबत

**(४७) १२६२८३ (२०-०७-२०१८). श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम), श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वैभववाडी (जि. सिंधुदुर्ग) तालुक्यात सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात श्री.एस.पी.पाटील व श्री.पी.एम.सावंत या दोन्ही ठेकेदारांनी जिल्हा वार्षिक हेडखालील रस्त्याची कामे हॉट मिक्स ऐवजी कोल्ड मिक्सचा वापर करून केल्याने निविदेतील अटी व शर्तीचा भंग केला हे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निविदेतील अटी व शर्तीचा भंग केल्याप्रकरणी संबंधित दोन्ही कंत्राटदारांचा समावेश काळ्या यादीत करण्याबाबत तक्रार श्री. अनुपम कांबळी यांनी दिनांक ३० नोव्हेंबर, २०१६ सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मुख्य अभियंत्यांकडे केली असतानाही त्यांना सार्वजनिक बांधकाम विभागाने पाच पैकी चार निकृष्ट दर्जाच्या कामांची पुर्ण देयके अदा केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संबंधित दोन्ही ठेकेदारांना निकृष्ट दर्जाच्या कामांची देयके अदा करणा-या संबंधित अधिका-यांवर निलंबनाची कारवाई करण्याबाबत तक्रार श्री. अनुपम कांबळी यांनी दिनांक २९ मे, २०१८ रोजी वा त्या सुमारास सार्वजनिक बांधकाम विभागाच्या प्रधान सचिवांची भेट घेऊन केली असून त्यांनी या प्रकरणी चौकशीचे आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी चौकशी करून संबंधित अधिका-यांवर निलंबनाची कारवाई करण्याबाबत तसेच निविदेतील अटी व शर्तीचा भंग करणा-या संबंधित दोन्ही ठेकेदारांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१७-११-२०१८) :**(१) व (२) होय, हे खरे आहे.

प्रश्नांकित कामाची कार्यकारी अभियंता यांनी पहाणी केली असून, पाचपैकी चार कामांच्या हॉटमिक्सच्या बाबी करीता कमी दराचे दरविश्लेषण करुन देयके अदा करण्यात आली आहेत.

(३) श्री अनुपम कांबळी यांनी प्रधान सचिव(सा.बा.वि.) यांना दि. २९ मे,२०१८ रोजी सादर केलेले पत्र आढळून येत नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### हिंगोली जिल्हयात प्रकल्प उपसंचालक यांनी सेंद्रिय शेती निविष्ठा व शेतीसाठीचे अन्य साहित्य खरेदीमध्ये लाखो रुपयांचा केलेला गैरव्यवहार

**(४८) १२६३४७ (०२-०८-२०१८). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्हयात प्रकल्प उपसंचालक (आत्मा) कृषि विभाग या पदावर सन २०१६-२०१७ व २०१७-२०१८ या कालावधीत सेंद्रिय शेती निविष्ठा व शेतीसाठीचे अन्य साहित्य खरेदीमध्ये लाखो रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे माहे जून,२०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,.

(२) असल्यास, शेतक-यांना कृषि निविष्ठा (कृषि साहित्य) वाटप न करताच शेतक-यांना वाटप केल्याचे कागदोपत्री दाखवून शेतक-यांची फसवणूक करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोंषीविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१७-११-२०१८) :** (१ ) नाही.

मार्च २०१८ मध्ये सेंद्रिय शेतीच्या गटांनी, S- ९ कल्चर, बायोमिक्स, ॲझॅटोबॅक्टर इ. बाबींची मागणी केलेली होती. सेंद्रिय शेतीच्या गटांनी सदर बाबींचे निविष्ठांचे देयक, संमतीपत्रक व पोहोच पावती कार्यालयास सादर केल्यानंतर, सदरील देयकाची रक्कम संबंधित कंपनीला धनादेशाद्वारे RTGS वितरीत करण्यात आलेली आहे.

(२) नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बांदा-दोडामार्ग राज्य मार्गाच्या बाजूने पाईपलाईन टाकण्याच्या कामात झालेला गैरव्यवहार**

**(४९) १२६३५० (२०-०७-२०१८). श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम), श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तिलारी प्रकल्पावर आधारित पाणीपुरवठा योजनेंतर्गत बांदा-दोडामार्ग राज्य मार्ग क्रमांक १८६ च्या बाजूने मोठी पाईपलाईन टाकण्याबाबतचे अंदाजपत्रकीय रक्कम १ कोटी ९४ लाख ९७ हजार १६२ रुपयांचे काम कोणतीही पूर्वपरवानगी न घेता १५ तुकड्यांमध्ये विभागण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दिनांक २५ मार्च, २०१३ रोजीच्या शासन निर्णयानुसार रु. १० लाखापेक्षा अधिक खर्चाच्या कामांना ई -निविदा कार्यप्रणाली लागू करण्यात आली असून सदर १५ तुकड्यांमध्ये विभागलेली सर्व कामे रु. १० लाखापेक्षा अधिक रकमेची आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, सदर कामे संबंधित अधिकारी व ठेकेदार यांनी संगनमत करून ई-निविदा प्रक्रिया न राबविता नियमबाह्यरित्या वाटप करून सार्वजनिक बांधकाम विभागाच्या संबंधित अधिका-यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दिनांक २५ मार्च, २०१३ रोजीच्या शासन निर्णयातील अटी व शर्तीचे उल्लंघन केले आहे , हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणातील दोषी अधिका-यांवर निलंबनाची कारवाई करण्याबाबत तक्रार कस्तुरीमृग फाऊंडेशनचे अध्यक्ष श्री.अनुपम कांबळी यांनी दिनांक २९ मे, २०१८ रोजी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या प्रधान सचिवांची भेट घेऊन केली असून त्यांनी सदर तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करण्याचे आदेश दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत चौकशी करून संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रकांत पाटील (१९-११-२०१८) :**(१)अंशत: खरे आहे,या कामाची विभागणी करण्यात आली आहे व त्यास सक्षम प्राधिकाऱ्यांनी कारणे तपासून मान्यता दिली आहे.
(२) हे खरे आहे,कामाचे वाटप सुशिक्षीत बेरोजगार अभियंता कंत्राटदारांना व मजुर सहकारी संस्थाना विहित नियमानुसार वाटप समितीकडून करण्यात आले आहे.
(३) या प्रकरणी जिल्हास्तरावर मंडळ कार्यालयाकडून परवानगी देण्यात आली आहे.तथापी संपूर्ण माहिती मंत्रालयस्तरावर प्राप्त करून घेवून तपासण्यात येईल.
(४), (५) व (६) संबंधिताचे मा.प्रधान सचिव(सा.बां.) यांना सादर केलेले पत्र अभिलेखावर नाही. तथापी उपरोक्त प्रकरणी क्षेत्रीय अहवाल प्राप्त करून त्याची तपासणी करण्यात येईल.

---

## मौजे वैताकवाडी (ता.चंदगड, जि.कोल्हापूर) येथील गट नंबर २० मधील अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्याबाबत

**(५०) १२६३५५ (२०-०७-२०१८). श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम), श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे वैताकवाडी (ता.चंदगड, जि.कोल्हापूर) येथे गट नंबर २० च्या ७/१२ उता-यामध्ये सौ. सुनिता मदन सामंत यांचे नाव समाविष्ट असून सदर जमिनीची आकारफोड झालेली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर जमिनीत श्री.गोविंद चांदेकर, श्री.विजय किणेकर, श्रीमती प्रभावती गौदडकर व श्री.कल्लाप्पा पाटील यांनी त्यांच्याकडे कोणतेही खरेदीखत नसताना बांधकामे केली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरची अनधिकृत बांधकामे पाडून टाकण्यासंदर्भात आमदार वैभव नाईक यांनी माहे जून, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांचेकडे तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर तक्रारीच्या अनुषंगाने संबंधित अनधिकृत बांधकामावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२२-११-२०१८)** :(१), (२), (३) व (४) मौजे वैताकवाडी, ता. चंदगड, जि. कोल्हापूर येथिल गट नंबर २० च्या गाव नमुना नं.७/१२ मध्ये सौ. सुनिता मदन सामंत यांचे सामाईकपणे नाव दाखल असून सदर जमिनीची आकारफोड झालेली नाही. सदर जमिनीवर श्री. गोविंद चांदेकर, श्री. विजय किणेकर, श्रीमती प्रभावती गौदडकर व श्री. कल्लाप्पा पाटील यांनी सदर जमिनीतील सहहिस्सेदार यांचेकडून नोटरी करून त्यावर घरे बांधलेली असल्याचे दिसून येते. मा. विधानसभा सदस्य श्री. वैभव नाईक यांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने सदर प्रकरण तहसिलदार, चंदगड यांचेकडे चौकशीसाठी पाठविण्यात आले असून चौकशी अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्याचे संकल्पित आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.